परमपिता शिव परमात्मा

अमृत कुंभ

वर्ष १३ । अंक १ । एप्रिल-मे २०१९ । मूल्य रु. १३/-

शांतिवन (आबू रोड) : '१२० वर्ल्ड रेकॉर्ड' करणारा पहिला भारतीय हे प्रमाणपत्र ब्र. कु. डॉ. दीपक हरके यांना प्रदान करतांना संस्थेच्या सह मुख्य प्रशासिका राजयोगिनी दादी रतनमोहिनीजी.

राहुरी : पालकमंत्री श्री. राम शिंदे यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. बालूभाई (शांतिवन), ब्र. कु. नंदा, शोभा व आशा बहेन.

सायन : राजयोगिनी बृजइंद्रा दादी उड्डाण पुलाचे उद्घाटन प्रसंगी राजयोगिनी संतोष दीदी, मुंबई भा. ज. पा. चे अध्यक्ष श्री. शेलार, आमदार श्री. सेल्वन व अन्य मान्यवर.

मालाड (मुंबई) : शिवदर्शन झांकीच्या प्रसंगी टी.व्ही. कलाकार निधी उत्तम यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. कुंती बहेन.

बार्शी : खासदार श्री. रविंद्र गायकवाड यांना ईश्वरीय संदेश दिल्यानंतर भेटवस्तू देतांना ब्र. कु. संगीता बहेन.

ठाणे (प.) : टी. व्ही. कलाकार श्री. शैलेश लोढा यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. बिंदीया बहेन व कंचन बहेन.

लातूर : राज्यस्तरीय 'उर्जा संवर्धन ॲवार्ड' ब्र. कु. नंदा बहेन व पुन्या बहेन यांना प्रदान करतांना श्री. अभय बाकरे.

विलेपार्ले(मुंबई) : राजयोगिनी ब्र. कु. योगिनी बहेन यांना 'आंतरराष्ट्रीय मानव अधिकार अवॉर्ड प्रदान करतांना डॉ. अँथनी राजू, अध्यक्ष मानव अधिकार संस्था.

परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

अमृतकुंभ

अंतरंग

वर्ष १३, अंक १. एप्रिल–मे २०१९

मुखपृष्ठाविषयी

जसे आपल्याकडे छत्री असल्यानंतर आपण ऊन व पाऊस यांच्यापासून अगदी सहजपणे सुरक्षित राहू शकतो. तसेच परमात्म छत्रछायेखाली असणारा योगी तू आत्मा, सर्व प्रकारच्या विघ्नांपासून सहज व सदा मुक्त असतो. याचेच गायन आहे – 'जिसको राखे साई, उसका बाल न बाँका होई।'

अशा योगी तू आत्म्याची मुख्य लक्षणे पुढीलप्रमाणे असतात – १) नियमित अमृतवेळेला योग २) ज्ञानमुरलीचे श्रवण अथवा वाचन ३) कर्मयोगी जीवन ४) ईश्वरीय सेवा ५) दैनंदिन चार्ट लिहिणे ६) सदैव सुखदायी दृष्टी, वृत्ती, बोल व कर्म. संगमयुगात सदा परमात्म छत्रछायेखाली रहाण्याचे परम सौभाग्य योगी तू आत्माच प्राप्त करू शकतो. त्यामुळे निरंतर व सहजयोगी जीवनाचा अनुभव करा. तसेच इतरांनाही त्यासाठी आवश्यक ईश्वरीय ज्ञान प्रदान करा.

– प्रकाशक अमृतकुंभ



१) जीवनात काही चांगल्या धारणा हव्या ... (दादी जानकीजी) २
२) आता शांतीची शक्ती जमा करुया... (संपादकीय) ४
३) अंधश्रद्धेचा घोर अंध:कार नष्ट करुया (कविता) ६
३) विश्वनाटकातील भारताची सर्वश्रेष्ठ भूमिका ७
४) सत्ययुग कितीसे दूर... (कविता) ९
५) लवलीन स्थितीचा अनुभव करुया १०
६) कल्पकल्पांच्या वैश्विक ड्राम्यात अंशमात्रही बदल होत नाही! १३
७) सचित्र सेवावृत्त १५
८) फरिश्ता (देवदूत) स्वरुपाचा अनुभव करण्यासाठी विशेष ज्ञानबिंदू १९
९) प्रभुप्रेमात मग्न होऊन जा. कारण २०
१०) सहनशीलता.. एक अद्‌भुत शिल्पकार..(भाग–१) २१
११) जो निर्भय आहे, तोच खरा ज्ञानी २४
१२) वाचकांशी हितगुज २७
१३) कमजोर संस्कारांना परिवर्तन करण्यासाठी... २८

फोटो, लेख आदी पाठविण्याचा पत्ता :
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

वर्गणी पाठविण्याचा पत्ता :
बी.के. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंटस्, २२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) – ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४००६०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक ब्र. कु. शिवाजी चौधरी.

वार्षिक वर्गणी रु. ७५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,४००/–

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या –** www.amrutkumbh.com.

जीवनात काही चांगल्या धारणा हव्या ज्यामुळे हिंमत, विश्वास व उमंग-उत्साहाने स्थिती अचल, अडोल बनेल...

आदरणीय दादी जानकीजी

डायमंड हॉलमधील इतकी विशाल सभा पाहून रचयिता शिवबाबांची आठवण येते. येथील सर्व जण देहभानापासून मुक्त रहाण्याचे अनुभवी आहेत. मधुबनमध्ये आपला श्वास, संकल्प आणि समय सफल करण्याचेच काम आहे. तस पाहिलं तर खूप बोलून श्वास चढतो, असा अनुभव आहे. परंतु येथे राहून श्वास, संकल्प व समय खूप चांगल्या प्रकारे सफल होतो.

आत्मा शांत आहे तर एकही विचार येत नाही. जसे शिवबाबा सत् आहेत. चैतन्य आहेत तसेच आम्ही त्यांची मुलेही शांती व सत्यतेच्या आधारे आनंद स्वरुप बनतो. आता व्यर्थ गोष्टी ऐकण्यासाठी हे कान नाहीत आणि ऐकविण्यासाठी हे मुखही नाही. फलस्वरुप अंतर्मन सत्यता व प्रेमाने भरपूर आहे. **आपल्या सर्वांचे प्रसन्न चेहरे पाहून शिवबाबा म्हणतील की, 'माझी मुले किती खुशीत आहेत. सर्व जण कसे एक दुसऱ्याला आत्मिक दृष्टीने पाहतात. सर्वांना आत्मा-आत्मा, भाऊ-भाऊ ही स्मृती आहे. अन्य दुसरा भाव वा स्वभाव नाही. सर्व जण आत्मअभिमानी स्थितीत बसले आहेत,** खरं तर डायमंड हॉलमध्ये जशी सभा भरते तशी सभा संपूर्ण कल्पात भरत नाही. असा हॉल, असे स्थान संपूर्ण विश्वात कुठेच नाही. ड्रामानुसार मला संपूर्ण विश्व फिरण्याची संधी मिळाली आहे. शिवबाबांचे बनल्यामुळे मला भरपूर आत्मिक सुख प्राप्त झाले आहे. बाबांनाही आपल्याला पाहून तसेच ब्राह्मण परिवाराची वृद्धी पाहून किती आनंद होतो!

जसा संग तसा रंग. सारी कमाल आहे शिवबाबांची! येथे शिवबाबांच्या स्मृतीत बनवलेले भोजन सर्वांना मिळते. माझीही इच्छा होते की मी ही भंडाऱ्यात सेवेला जावे. जसे अन्न तसे मन बनते. येथील शुद्ध पवित्र भोजनाचा सर्वांना लाभ होतो. सर्वांना मोठ्या प्रेमाने ब्रह्माभोजन मिळते. प्रामुख्याने शिवबाबांचा संग व ब्रह्माभोजन या दोन गोष्टींमुळे आपण बापसमान बनतो. एकदा साकार ब्रह्माबाबांनी जेवणाचा एक घास हातात घेतला आणि विचारले की जनक, प्रथम तुला हा घास भरवू की शिवबाबांना? त्यावर मी म्हटले की, मी शिवबाबांना भरवते (जे शिवबाबांच्या तनात होते) तुम्ही मला भरवा. किती सुंदर दृश्य होते ते! मी प्रथम बाबांना घास भरवला आणि बाबांनी मला! यातून किती आंतरिक सुख व प्रेम मिळाले, याचे वर्णन करणे अशक्य आहे.

आपल्या या मुखाद्वारे काय बोलायचे, कसे बोलायचे ते शिवबाबा आपल्याला ज्ञानमुरलीद्वारे शिकवितात. त्यामुळे मला दुसरे काही बोलता येतच नाही. बाबा किती चांगला शिक्षक आहे. तसेच तो माता-पिता आहे. भक्तिमार्गात आपण गायन करीत होतो - '**तुम मात-पिता हम बालक तेरे, तुम्हारी कृपा से सुख घनेरे। कोई न जाने तुम्हारा अन्त, उँचे से उँचा है भगवंत।**' ज्याचा अंत कोणी जाणत नव्हते तो भगवंत स्वतः आपल्याजवळ बसून सांगतो की मी कोण आहे? त्यामुळे आता आपण त्यांना जाणतो. त्यांची स्मृती रहावी यासाठी शिवबाबा अशी दृष्टी देतात की आपल्या वृत्तीमध्ये त्यांची स्मृती सामावून जाते. त्यांची स्मृती आपल्याला अचल, अडोल बनविते, फलस्वरुप आपण कोणत्याही लहान-मोठ्या परिस्थितीत विचलीत होत नाही. परिस्थिती येते आणि जाते. परंतु

आपल्याला विचार करण्याची आवश्यकता पडत नाही. त्यामुळे घडून गेलेल्या गोष्टींचे चिंतन नको तसेच भविष्याची कोणतीही इच्छा नको. सदैव हे लक्षात ठेवा की **'हिम्मते बच्चे मदद दे बाप। सच्चे दिलपर साहेब राजी।' या विश्वासाच्या जोरावर आपल्याला बाबांची किती मदत मिळते! या अशा गोष्टींची धारणा जीवनात असेल तर हिंमत, विश्वास व उमंग-उत्साह रहातो व स्थिती अचल, अडोल बनते.**

जेव्हा कोणी जुन्या आणि दुसऱ्यांच्या गोष्टी लक्षात ठेवतात तेव्हा त्यांची अक्षरशः कीव (दया) येते. अरे, सोडा ना या गोष्टी! लक्षात ठेवा, जी अवस्था आता बनेल तीच अंत समयी राहिल आणि त्याप्रमाणेच पुढचा जन्म प्राप्त होईल. आता आपल्यापासून दुसऱ्यांना प्रेरणा मिळेल, अशी अवस्था बनवायची आहे.

मी माझ्या रुममध्ये अलौकिक पूर्वजांचे फोटो ठेवले आहेत. पूर्वज तो, जे सर्वांचे स्नेही व हितचिंतक आहेत. या ज्ञान यज्ञात अगदी सुरुवातीला समर्पित झालेली शिवबाबांची मुले, ते आपले पूर्वज होत. त्यांचे आपापसात खूप प्रेम होते. ते ऐकमेकांकडे पाहूनच किती खुश होत असत. आपण खरोखरच पद्मापद्म भाग्यशाली आहोत. **आपण जेथे राहू तेथे शिवबाबांच्या आठवणीत राहू आणि दुसऱ्यांनाही शिवबाबांची आठवण देऊ तेव्हाच खऱ्या अर्थी आपला श्वास, संकल्प आणि समय सफल होईल.**

आत्मा तर अतिशय छोटा ज्योतिबिंदू आहे. परंतु त्यात किती ज्ञान सामावलं आहे. ज्ञान जर आपल्या बुद्धीमध्ये व संस्कारामध्ये असेल तर कल्प-कल्प तेच संस्कार नोंदले जातात. कल्पापूर्वी बनलेले संस्कार आता पुन्हा शिवबाबांच्या ज्ञानाने बनत आहेत अथवा इमर्ज होत आहेत. आपल्याला शिकविणारे ज्ञानसागर शिवबाबा हे सर्व धर्म आत्म्यांचे पिता आहेत. प्रत्येक आत्मा मग तो कोणत्याही धर्माचा असो, कोणतीही भाषा बोलणारा असो, जेव्हा शिवबाबांना ओळखतो तेव्हा त्याला त्याच्या भाषेचा, धर्माचा देशाचा विसर पडतो. कारण आपण सर्व जण एक परमधामचे रहिवासी आहे. जे आपल्या पित्याचे घर तेच आपले घर! सर्वात महत्त्वाची गोष्टी म्हणजे आता आपल्याला परमधाममध्ये परत जायचे आहे. त्यामुळे सदैव हे गीत लक्षात ठेवा की 'अब घर जाना है।' जेव्हा कोणी शरीर सोडतो तेव्हा हे गीत स्मशानभूमी पर्यंत वाजवले जाते. आता आपल्या बुद्धीतही हे गीत वाजत राहिले पाहिजे. शिवबाबांची सदैव परमधाममध्ये आठवण करा. सदा स्मृती ठेवा की निमित्त मात्र या शरीरात आहोत. आता आपणा सर्वांना मूळच्या घरी परत जायचे आहे. आपल्याला शिवबाबांच्या बरोबर जायचे आहे नंतर सुखधामात (स्वर्गात) जायचे आहे. तसेच अनेकांना दुःखापासून मुक्त करायचे आहे. बिचारे या दुनियेत दुःखी आहेत, आता आपल्याला घरी जायचे आहे, हे सर्वांना सांगा. यासाठीच कर्म-विकर्म-अकर्माची गती शिवबाबांनी समजावून सांगितली आहे. अशा प्राणेश्वर शिवबाबांची आठवण करावी लागत नाही तर ती स्वतःहूनच येते. घरी जाण्यापूर्वी आपल्याला सुख-शांतीने संपन्न बनायचे आहे. १६ कला संपूर्ण बनायचे आहे. **हा जो संपूर्ण प्लॅन (योजना) कल्पापूर्वी ही प्रॅक्टीकलमध्ये आला होता तोच शिवबाबा आता सांगत आहेत. यात नवीन काहीच नाही. त्यामुळे समयानुसार 'अब घर जाना है।' हीच एक धुन सदैव मनात असली पाहिजे.**

भावानुवाद - ब्र.कु. मीनाक्षी बहेन, ठाणे (पू.)

***

अहंकार व हीनता (हीनभाव) हे दोन्ही आत्म्याचे मोठे शत्रू आहेत. यांनी ग्रासित आत्मा व्यर्थ चिंतनात येऊन अनेक विकर्म करतो. परिणामी दुःखी बनतो. पहिली गोष्ट म्हणजे आपल्या जीवनात ज्या प्राप्ती झाल्या आहेत त्यांचा अहंकार असता कामा नये. कारण या सर्व गोष्टी आपल्याला ईश्वराकडून प्राप्त प्रभू-प्रसाद आहे. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या मनात कधीही हीनभाव येता कामा नये. कारण आपण सर्व शक्तिवान परमात्मा पित्याची अविनाशी संतान आहोत. आपणही मास्टर सर्व शक्तिवान, विघ्नविनाशक आहोत.

- दादी जानकीजी

(संपादकीय)

आता शांतीची शक्ती जमा करुया...

सायन्स (विज्ञान) द्वारे आपण दूरवरच्या मनुष्याच्या मुखाचा आवाज ऐकू शकतो. परंतु सायन्स मनाचा आवाज आपल्यापर्यंत पोहचवू शकत नाही. शांतीच्या शक्तीद्वारे (साइलेन्स पॉवर) मात्र आपण प्रत्येक आत्म्याच्या मनाचा आवाज ऐकू शकतो. तो इतका समीप अनुभवाला येतो की जसे कोणी सन्मुख बोलत आहे. त्याचबरोबर आत्म्यांच्या मनातील अशांती व दुःखाच्या स्थितीचे चित्र देखील स्पष्ट पाहू शकतो. जसे टी. व्ही. द्वारे आपण दृश्य व स्थिती स्पष्टपणे पहातो. त्यासाठी फक्त आपण साधनाचे लाईटशी कनेक्शन जोडतो. स्वीच ऑन करतो आणि दूरवरच्या गोष्टी स्पष्ट पहातो व त्यांचे वर्णन ऐकतो. तसेच **पॉवर हाऊस शिवबाबांशी कनेक्शन जोडले, शुभभावना व शुभकामनांचा स्वीच ऑन केला तर दूरवर असलेले आत्मे समीप अनुभवाला येतील. यालाच विश्वकल्याणकारी स्थिती असे म्हटले जाते. परंतु अशाप्रकारची स्थिती बनविण्यासाठी आवश्यकता आहे – शांतीची शक्ती जमा करण्याची.**

शांतीची शक्ती जमा करण्याची विधी

वर्तमान समयी आपण ब्रह्मावत्स शांतीची शक्ती जमा करू या. मनाचा आवाज संकल्पांच्या रुपाने येईल. दुसऱ्यांच्या मनाचा आवाज ऐकण्यासाठी, व्यर्थ संकल्पांना समाप्त करून, एक समर्थ संकल्पात स्थित रहा. त्यासाठी आपल्या मनाला शिवबाबांची अमानत (ठेव) समजा व त्याद्वारे केवळ समर्थ संकल्प करण्याकडे लक्ष द्या. जसे आधी यज्ञात मुखाचे मौन ठेवण्याचा अभ्यास आपण सर्वांनी केला. तसे आता आवश्यकता आहे ती मनाचे मौन ठेवण्याची. त्यावेळी आपण 'कम बोलो, मीठा बोलो, धीरे बोलो' ही स्लोगन प्रॅक्टीकल जीवनात आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे साधारण व व्यर्थ बोल यांची अविद्या झाली होती. **आता सुद्धा आपण व्यर्थ व साधारण संकल्पांची अविद्या करू या व सदैव समर्थ संकल्प करण्याकडे अटेंशन देऊ या. हेच आहे मनाचे मौन. याद्वारेच शांतीची शक्ती जमा होते.**

व्यर्थ आहे बहिर्मुखता व समर्थ आहे अंतर्मुखता. त्यामुळे अंतर्मुखी बनून, व्यर्थ गोष्टी समेटून, त्यांना समर्थ अर्थात सारमध्ये आणल्याने शांतीची शक्ती जमा होईल. फलस्वरुप शांतीच्या शक्तीचे विचित्र अनुभव येतील. दूरवरचा आत्मा आपल्याला येऊन सांगेल की, 'तुम्ही मला योग्य रस्ता दाखवलात. तुम्ही मला बोलवले व त्यानुसार मी आलो आहे.' यज्ञाच्या इतिहासात आपण हे पाहिले की पिताश्री ब्रह्माबाबांचे स्वरुप अनेकांना स्पष्ट दिसत असे व त्यांना इशारा मिळत असे की या ठिकाणी तुम्ही पोहचा. असेच आता अंतिम समयी आपणा सर्व विश्वकल्याणकारी आत्म्यांचाही असाच विचित्र पार्ट चालणार आहे. त्यासाठी आपल्याला शांतीची शक्ती जमा करण्याची व सर्व बंधनातून मुक्त स्वतंत्र बनण्याची आवश्यकता आहे. असे निर्बंधन आत्मेच अनेकांना जीवनमुक्त बनवू शकतील.

शांतीच्या शक्तीची महानता

शांतीची शक्ती क्रोधाग्नि शांत करते. व्यर्थ संकल्पांची हलचल समाप्त करते. शांतीची शक्ती कसेही जुने संस्कार असले तरी ते समाप्त करते. शांतीची शक्ती अनेक प्रकारचे मानसिक रोग समाप्त करते. शांतीची शक्ती अनेक

आत्म्यांचे मीलन शांतिसागर परमात्म्याशी करवते. शांतीची शक्ती अनेक जन्मापासून भटकणाऱ्या आत्म्यांना ठिकाणा प्राप्त करवून देते. त्यांना महान आत्मा, धर्मात्मा बनवते. शांतीची शक्ती कमी मेहनतीत श्रेष्ठ भाग्य बनवते. शांतीची शक्ती समयाच्या खजिन्याची बचत करते. अर्थात कमी वेळात सफलता अधिक प्रदान करते. सदैव आपल्या गळ्यात सफलतेची माळ घालते. ही आहे शांतीच्या शक्तीची महानता!

शिव-शक्तींची विशेषता

शिव-शक्तींची मुख्य विशेषता म्हणजे त्या एकही व्यर्थ संकल्प करीत नाहीत. त्यांच्या एक-एक संकल्पात स्वतःचे तसेच सर्वांचे कल्याण सामावलेले असते. त्या एक सेकंदात, एक संकल्पात देखील दुसऱ्याचे कल्याण करू शकतात. म्हणूनच शिव-शक्तींना कल्याणी असे म्हटले जाते. जसे शिवबाबा कल्याणकारी आहेत तशा शिव-शक्तीसुद्धा कल्याणकारी आहेत. त्यामुळे हे चेक करा की आपले किती संकल्प सफल झाले व किती असफल झालेत. प्रत्येक संकल्प सफल करण्याकडे लक्ष द्या. जशी सायन्सने आजकाल खूप उन्नती केली आहे. एका ठिकाणी बसून ते आपल्या अस्त्राद्वारे सेकंदात विनाश करू शकतात. तसेच शिव-शक्तींना सुद्धा शांतीच्या शक्तीद्वारे १ सेकंदात सेवा करता आली पाहिजे. आपल्या शुद्ध संकल्पाद्वारे आत्म्यांचे आवाहन करता आले पाहिजे. आता अशा प्रकारचा प्रभाव पहायला मिळेल. जसे साकार बाबा म्हणत असत की असा तीर चालवा की तीरासहित पक्षी तुमच्या समोर येईल. आता आपल्या इच्छाशक्ती (will power) द्वारे या गोष्टी घडतील. त्यासाठी वर्तमान समयी शांतीची शक्ती प्रॅक्टीकल जीवनात धारण करा. मुख्य म्हणजे शांतीच्या शक्तीमुळे पारखण्याची शक्ती व निर्णय शक्ती प्राप्त होते. फलस्वरुप परिवर्तन तीव्र गतीने होते.

सायन्सची शक्ती प्रकृतीच्या ५ तत्त्वांवर नियंत्रण ठेवण्यात यशस्वी झाली आहे. मग आपण शिव-शक्ती, मास्टर रचता, मास्टर सर्व शक्तिवानच्या पुढे प्रकृती व परिस्थिती दासी बनणार नाही का? जर सायन्सची अणुशक्ती महान कार्य करू शकते तर आत्मिक शक्ती, परमात्म शक्ती काय करू शकणार नाही? परंतु अजून आपल्याला त्याचा अनुभव फार थोडा व कधी-कधीच येतो. तथापि निकट भविष्यात आपल्यातील प्रत्येक जण कमाल करतांना दिसेल. लवकरच आपले संगठन हे विश्व कल्याणकारी संगठन म्हणून प्रसिद्ध होईल. सायन्सद्वारा सायलेन्सच्या शक्तीचा नाम बाला (उदोउदो) होईल. राजयोगाद्वारे कोणत्या शक्ती प्राप्त होतात, त्या कुठपर्यंत पसरतात, त्यांची विधी व गति काय असते या सर्व गोष्टी विज्ञानाद्वारे प्रत्यक्ष होतील. त्यामुळे आपण किती महान कार्यासाठी निमित्त बनलो आहोत, याची स्मृती सदैव जागृत ठेवा. तसेच समयानुसार आता व्यर्थ गोष्टींना सोडून, सदा समर्थ स्वरुप बना.

महारथी आत्म्यांचे कर्तव्य

जसे आजकाल शास्त्रज्ञ असे शोध लावतात की ज्यामुळे मेहनत कमी व सफलता अधिक प्राप्त व्हावी. तसेच महारथी आत्म्यांचे कर्तव्य आहे की त्यांनी असा शोध लावला पाहिजे ज्यामुळे साधना कमी व सिद्धी अधिक प्राप्त होईल. जसा आजार तसे औषध शोधून काढले जाते. तसेच आजकाल जे चोहीकडचे वातावरण आहे, ज्ञानात येणारे आत्मे कमजोर आहेत, त्यांना सुद्धा पुरुषार्थ करणे सहज शक्य व्हावे, यासाठी नवीन साधनांचा शोध केला पाहिजे. सद्यस्थितीत मोबाईल व टी.व्ही. (Peace of Mind) द्वारे होत असेलेली ईश्वरीय सेवा अतिशय उपयुक्त ठरत आहे. त्यासाठी 'मीडिया विंग' चे महारथी आत्मे विशेष निमित्त बनले. त्यांना अनेकानेक आत्म्यांच्या दुवा (आशीर्वाद) अवश्य प्राप्त होत असतील. कारण एखादा ब्रह्मावत्स जगाच्या पाठीवर कुठेही गेला तरी ईश्वरीय ज्ञानाचा खजिना त्याच्या सोबत असतो. काही वर्षापूर्वी आपण जेव्हा मधुबनला किंवा बाहेर गावी जात असू तेव्हा मुरलीची झेरॉक्स प्रत घेऊन जात असू. आता मात्र दिवस बदलले आहेत. आता 'मोबाईल मुरली' या ॲपद्वारे आपण कधीही, कुठेही, कितीही वेळा

मुरली वाचू वा ऐकू शकतो. तात्पर्य म्हणजे सध्याच्या धावत्या जगात जे सेवाकेंद्रावर मुरली ऐकण्यासाठी येऊ शकत नाहीत; त्यांच्यासाठी ही सुविधा अतिशय चांगली आहे. तथापि सेवाकेंद्रावर संगठनमध्ये योगयुक्त स्थितीत बसून, तपस्वीमूर्त निमित्त टीचरद्वारे मुरली ऐकण्याचा जो आनंद आहे, तो खरंच अवर्णनीय असा आहे. आपण सर्वजण याचे अनुभवी आहोतच.

शांतीच्या शक्तीद्वारे प्रत्यक्षतेचा नगारा

आजवर आपण खूप ज्ञान ऐकले. आता समय आहे ज्ञानस्वरुप बनण्याचा. आपल्या स्वरुपाद्वारे सेवा करण्याचा. याच सेवेद्वारे प्रत्यक्षतेचा नगारा वाजेल. जोपर्यंत मुखाचे नगारे वाजत आहेत तोपर्यंत प्रत्यक्षता होणार नाही. जेव्हा मुखाचे नगारे बंद होतील तेव्हा प्रत्यक्षतेचा नगारा वाजेल. याचेच गायन आहे – 'सायन्सवर साइलेन्सचा विजय'. ('वाणीचा विजय' असे गायन नाही.) **त्यामुळे समयाच्या समाप्तीची निशाणी असेल की, 'आपल्याला स्वाभाविकपणे आवाजात यावेसे वाटणार नाही. शांतीची स्थिती ही नॅचरल स्थिती वाटेल. आवाजात येण्याविषयी मनात वैराग्य येईल.' असे परिवर्तन जेव्हा अनुभवाला येईल तेव्हा विजयाचा नगारा वाजेल. तात्पर्य म्हणजे शांतीच्या शक्तींद्वारेच विजयाचा नगारा वाजेल. म्हणूनच आता आपण शांतीची शक्ती जमा करु या.**

***

अंधश्रद्धेचा घोर अंधःकार नष्ट करुया

अंधश्रद्धेचा आरंभ मनुष्य नकळत स्वतःपासूनच करतो!
तो स्वतःला अविनाशी आत्मा न मानता, विनाशी देह मानतो ।।१।।

परमात्म परिचयाशिवाय सर्वांनी त्याला सर्वव्यापी मानिले।
तो सर्वव्यापी नाही हे केवळ ब्रह्माकुमार व कुमारीने जाणिले ।।२।।

अंधश्रद्धेच्या कारणे वाढले आहे आत्मा परमात्म्यातील अंतर।
यथार्थ श्रद्धेद्वारेच आत्मस्मृती व परमात्मस्मृती राहील निरंतर ।।३।।

पुराणकथांच्या द्वारे झाली आहे परमात्मा व देवात्म्यांची ग्लानी।
रचयिता व त्याच्या रचनेची वास्तविकता जाणूनी व्हावे ज्ञानी ।।४।।

देहधारी देवतांना परमात्मा मानण्याची अंधश्रद्धा नसावी।
परमात्म परिचय प्राप्त करूनी यथार्थ श्रद्धा जोपासावी ।।५।।

विदेही परमात्म्याला सद्गुरू मानणे अंधश्रद्धा नसते।
गुरुलाच सद्गुरू मानणे अंधश्रद्धा ही निश्चित असते ।।६।।

देवतांच्या बहुमुखी मूर्ती पाहून 'मतिभ्रम' होतो मनुष्याचा।
परमात्म ज्ञानाद्वारेच भेद होईल ह्या आध्यात्मिक रहस्याचा ।।७।।

चार भुजांचे रहस्य न जाणताच पूजन होते श्री विष्णुचे।
चतुर्भुज विष्णु हे एकत्रित रूप असते श्री लक्ष्मीनारायणाचे ।।८।।

श्रीरामाच्या काळी बोलणारी वानरे होती, अंधश्रद्धा ही सकळांची।
विज्ञान व प्रकृतीचे नियम जाणूनी उकल करावी सत्याची ।।९।।

मनुष्याला पशु-पक्षी व किटकांचा जन्म प्राप्त होत नसतो।
'चौऱ्यांशी लक्ष योनीचा', मनुष्य निर्मित सिद्धांत मिथ्या असतो ।।१०।।

अंधश्रद्धेच्या पोटी गेले आहेत कित्येक नरबळी व पशूबळी।
अज्ञानींना सज्ञान करूनी संपवूया अंधश्रद्धेची ही क्रूर खेळी ।।११।।

मानवतेला कलंकित करणारे कर्म असते हे असुरी वृत्तीचे।
गुप्तधनाच्या लालसेपायी महापाप होत आहे क्रूर कर्म्यांचे ।।१२।।

ज्ञानदीप चेतवूनी अंधश्रद्धेचा हा अंधःकार नाहीसा करुया।
ह्याची ज्ञानप्रकाशात अंधश्रद्धामुक्त युगाचे दर्शन करुया ।।१३।।

अंधश्रद्धामुक्त युगात गरज नसते आध्यात्मिक श्रद्धेची।
म्हणून सत्ययुग-त्रेतायुगात अविद्या असते अंधश्रद्धेची ।।१४।।

स्वर्ग व नर्काविषयी असलेली मानवी कल्पना मिथ्या असते।
ह्या दोन्हींचे अस्तित्व भारतात एकाच वेळी कधीच नसते ।।१५।।

– ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे

विश्वनाटकातील भारताची सर्वश्रेष्ठ भूमिका

ब्र. कु. चंद्रशेखर, शांतिवन (आबू रोड)

जसे आपण एखादे तीन तासाचे नाटक बघण्यासाठी नाट्यगृहात जातो. तत्पूर्वी त्या नाटकातील कलाकार, त्याचे कथानक, त्याविषयीच्या लोकांच्या प्रतिक्रिया इत्यादी गोष्टी जाणून घेतो. तसेच विश्वरुपी रंगमंचावर चालणारे ५००० वर्षाचे हे विश्वनाटक कसे चालते, त्यातील मुख्य कलाकार कोणते, नाटकाचा दिग्दर्शक कोण, त्यातील मुख्य अंक किती, त्या नाटकाचा मुख्य आधार कोणता या गोष्टींविषयीची माहिती आपण साररुपाने प्रस्तुत लेखात पाहणार आहोत. **सगळ्यात गंमत अशी आहे की आपण स्वतः या नाटकातील कलाकार आहोत. परंतु हे संपूर्ण नाटक कसे चालते, हे मात्र आजवर जाणत नव्हतो. या विश्वनाटकाचा मुख्य कलाकार व दिग्दर्शक 'शिव' परमात्मा जेव्हा या सृष्टीवर अवतरित होतो तेव्हाच आपल्याला सारांशाने या विश्वनाटकाची कल्पना येते.** कुणाला असा प्रश्न पडेल की आपण या नाटकातील एक कलाकार असूनही, ते पूर्णतः जाणत नाही; हे कसे? तर याचे कारण म्हणजे आपली अल्पमती (अर्थात आली बुद्धी अत्यंत मर्यादित स्वरुपाची आहे) या विश्वनाटकाला जाणण्याचे प्राचीन काळापासून ऋषी-मुनींनी खूप प्रयत्न केले. परंतु शेवटी ते हेच म्हणाले की 'नेति-नेति' अर्थात रचयिता व त्याच्या रचनेला आम्ही जाणत नाही. त्यामुळे अशा अगम्य, अद्‌भूत अशा विश्वनाटकाविषयीचे ईश्वरीय ज्ञान जाणून घेणे, आपणा सर्वांनाच आवडेल.

भारत व कालचक्र

समयाच्या गतिचा विचार केल्यास भूतकाळ, वर्तमान काळ व भविष्य काळ असे हे कालचक्र अव्याहतपणे चालू असते. या कालचक्रात ज्या ज्या घटना आजवर घडल्या, त्याविषयी विचार केला तर असे दिसून येईल की त्यात भारताला विशेष महत्त्वाचे स्थान आहे. विश्वनाटकाच्या परिवर्तनाच्या सिद्धांतानुसार भारताचे ही रुप परिवर्तन होत गेले. परंतु सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारत तिन्ही काळात व चारही युगात असतो. फक्त त्याच्या स्थितीत (सतो, रजो, तमो) परिवर्तन होत जाते. सत्ययुग व त्रेतायुगात भारतात रामराज्य (अर्थात स्वर्ग) असते आणि द्वापर-कलियुगात भारतात रावणराज्य (अर्थात नरक) असते. या चारही युगांचा कालावधी अर्थात एक कल्प हे ५००० वर्षाचे आहे व त्यातील प्रत्येक युग हे १२५० वर्षाचे आहे. सत्ययुगात भारत सतोप्रधान, त्रेतायुगात सतोगुणी, त्रेतायुगात रजोगुणी कलियुगात तमोगुणी बनत जातो. कलियुगाच्या शेवटी जेव्हा भारत पतित तमोप्रधान बनतो. तेव्हा भारताला पुन्हा पावन सतोप्रधान बनविण्यासाठी परमात्म्याचे दिव्य अवतरण भारतात होते. याचेच गायन गीतेतही 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत...' असे केले आहे. तात्पर्य म्हणजे ५००० वर्षाच्या या कालखंडात कालचक्राची पुनरावृत्ती होत असते. सर्वात महत्त्वाची व अत्यानंदाची गोष्ट म्हणजे भारत ही अविनाशी परमात्म्याची अवतरण भूमी असल्याने, ती देखील अविनाशी आहे. **या अनुषंगाने शिव परमात्म्याने ब्रह्मामुखाद्वारे उच्चारण केलेली पुढील महावाक्ये अतिशय उद्‌बोधक आहेत. ''भारत मेरी अवतरण भूमि है। मैं भारत को ही स्वर्ग बनाता हूँ। ये सारा खेल भारत पर ही बना हुआ है। भारत भूमि अविनाशी है।''**

भारताचा गौरवशाली भूतकाळ

आदिकाळात अर्थात ५ हजार

वर्षापूर्वी भारतातच स्वर्ग होता. येथे देवी-देवतांचे राज्य होते. सुख, शांती व समृद्धी होती. यालाच भारताचा सुवर्णकाळ असे म्हटले जाते. परंतु परिवर्तनाच्या नियमानुसार सुख, शांती व समृद्धी कमी होत गेली. तरी देखील त्या काळाची आठवण आजही सर्व धर्मात केली हाते. त्यालाच निरनिराळ्या धर्मात स्वर्ग, हेवन, पॅराडाईज, जन्नत इत्यादी नावांनी ओळखले जाते. त्या भारतातेच गायन केले जाते, 'जहाँ ड़ाल-ड़ालपर सोने की चिडियाँ करती थी बसेरा, वो भारत देश है मेरा।' तात्पर्य म्हणजे भारतात सर्व सुखांचे भांडार होते.

भारताचे गौरवशाली भविष्य

या सृष्टिचक्रात प्रत्येक गोष्ट वा घटना ही पुनरावृत्त होत असते. त्यानुसार भारत आज पतित, तमोप्रधान, दुःखी बनला आहे तो पुन्हा आपला पूर्व गौरव आणि समृद्धी अवश्य प्राप्त करेल. त्यासाठीच परमात्मा राजयोग शिकवित आहेत. त्याचबरोबर महाभारत लढाई अर्थात तिसऱ्या विश्व युद्धाची सुद्धा तयारी होत आहे. या महाभारत लढाई नंतर भारत पुन्हा स्वर्ग बनेल. ही केवळ कल्पना नसून, शत प्रतिशत सत्य आहे.

भारताचा नंबर वन शत्रू आहे. रावण (अर्थात पाच विकार) व नंबर वन मित्र आहे - शिव राम अर्थात शिव परमात्मा, जो भारतात अवतरित होऊन, भारताला पुन्हा स्वर्ग बनवतो.

भारताचा गौरवशाली मध्यकाळ व अंतिम पर्व

मध्यकालीन भारतात विक्रमादित्य, हर्षवर्धन, पृथ्वीराज चौहान इत्यादी प्रतापी राजे झाले. तसेच गौतमबुद्ध, शंकराचार्य यांच्यासारखे धर्मस्थापक जन्माला आले. त्यानंतर कलियुगाच्या अंतिम पर्वात महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी यांच्यासारखे वीरपुरुष होऊन गेले. तसेच विवेकानंद, महात्मा गांधी यांच्यासारख्या महान आत्म्यांनी भारताची मान-मर्यादा कायम ठेवली. अंती इंग्रजांशी झालेल्या स्वतंत्रता संग्रामात झाशीची राणी जशा वीरांगणांनी तसेच भगतसिंह प्रमाणे अनेक स्वतंत्रता सेनानींनी आपल्या जीवनाचे बलिदान देऊन भारताचा मान राखला.

तात्पर्य म्हणजे सृष्टीच्या नियमानुसार जो भारत सतोप्रधान होता तो आज तमोप्रधान बनला आहे. आज भारतातील कित्येक गोष्टी तमोप्रधानतेची चरम सीमा प्रदर्शित करतांना दिसत आहेत. त्यामुळेच भारतात धर्माची अति ग्लानी झाली आहे; असे म्हटले जाते.

भारताचा गौरवशाली वर्तमान काळ

सृष्टिचक्रातील संगमयुगाचा काळ (कलियुगाचा अंत व सत्ययुगाचा आदि यांचा संधीकाळ) अतिशय सुंदर व परम सौभाग्यशाली काळ आहे. कारण यावेळी भारतात निराकार शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण प्रजापिता ब्रह्मा यांच्या साकार शरीरात होते व त्यांच्याद्वारे ज्ञानसागर परमात्मा सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे ज्ञान देतात. तेव्हाच आपल्याला हे ज्ञान होते की विश्व नाटकाचा केंद्र बिंदू वा आधार भारत आहे. भारत अविनाशी भूमि आहे. भारतच स्वर्ग बनतो व नरक ही बनतो. चार ही युगात भारतात जनतेचे वास्तव्य असते. सत्ययुग व त्रेतायुगात अर्थात स्वर्गात भारतात आदि सनातन देवी-देवता धर्म होता, जो आज सनातन हिंदू धर्म म्हणून ओळखला जातो. वास्तविक सनातन या शब्दाचा अर्थ आहे जो कधीही पूर्णपणे लोप पावत नाही. याउलट अन्य धर्म द्वापर युगानंतर स्थापन होतात आणि विनाशाच्या वेळी त्या धर्माचे सर्व आत्मे परमधाम मध्ये परत जातात. परंतु आदि सनातन देवी-देवता धर्माचे सर्व आत्मे एकावेळी परमधाममध्ये जात नाहीत. तसेच त्या धर्माची स्थापना सुद्धा नव्याने होत नाही. तर त्या धर्माचे कलम लावले जाते. कल्पाचे अंती परमपिता शिव परमात्मा संगमयुगात भारतात अवतरित होऊन, त्या धर्माचे कलम लावतात अर्थात पतित आत्म्यांना पावन बनवितात.

परमात्माद्वारे विश्व परिवर्तनाचे कार्य भारतातूनच केले जाते. परमात्म्याच्या श्रीमतानुसार भारतववासी बंधुभगिनी (ब्रह्मावत्स) विदेशात जाऊन परमात्म्याचा संदेश देतात. फलस्वरुप सर्व धर्मवंशाच्या आत्म्यांचे कल्याण होते. सर्व धर्म वंशाचे धर्मपिता भारतात येऊन, परमात्म्यापासून संदेश प्राप्त

करतात व आपल्या धर्म वंशातील आत्म्यांना तो देतात. फलस्वरुप ते आत्मे देखील पावन बनून, परमात्मा पित्याकडून मुक्ती व जीवनमुक्तीचा जन्मसिद्ध अधिकार प्राप्त करतात. फलस्वरुप महाभारी विनाशानंतर ते मुक्तिधामध्ये परत जातात व आपल्या समयानुसार धर्मपिता पुन्हा येऊन, आपल्या धर्मवंशाची स्थापना करतात. अशाप्रकारे संगमयुगात भारतवासी ब्रह्मावत्स, परमात्म्याच्या दिव्य कार्यात सहयोगी बनतात. म्हणूनच संगमयुगाला हिरेतुल्य म्हटले जाते व याच्या तुलनेत सत्ययुगाला सुवर्णतुल्य म्हटले जाते.

भारत देश महान

परमात्मा महान आहे. तो ज्या भारत देशात येतो तोही महान आहे. भारतातील राजस्थानची भूमी महान आहे. राजस्थानमधील आबू तीर्थ महान आहे. आबू मधील पांडव भवन विशेष महान आहे. पांडव भवनमध्ये सुद्धा ज्या ज्या ठिकाणी बसून परमात्म्याने साकार ब्रह्माद्वारे आत्म्यांचा ज्ञानरत्नांनी शृंगार केला, ती स्थाने विशेष महान आहेत. त्या ठिकाणी विशेष वायब्रेशन सामावलेली आहेत. त्यामुळे तेथे गेल्यावर आत्म्यांना पावन बनण्यासाठी विशेष मदत मिळते. ती चार स्थाने म्हणजे १) शांती स्तंभ २) बापदादांचा कमरा ३) झोपडी ४) हिस्ट्री हॉल. भक्तिमार्गात जसे चारधामाचे महत्त्व आहे. तसेच या चार धामाचे ही अतिशय महत्त्व आहे. यावरुन आपल्या लक्षात आले असेल की आबू हे भारतातील सर्वात पवित्र तीर्थस्थान आहे कारण याठिकाणी येऊनच परमात्मा स्वर्गाची स्थापना करतात. तसेच सर्व आत्म्यांची सद्गति करतात. या अनुषंगाने ज्ञानसागर शिव परमात्म्याची पुढील महावाक्ये सदैव लक्षात ठेवा **'मीठे बच्चे, सर्व तीर्थो में श्रेष्ठ तीर्थ आबू है। सारे वर्ल्ड के तीर्थो में यह सबसे बडा तीर्थ है, जहाँ बाप बैठ सबकी सद्गति करते है। सारे विश्व को नर्क से स्वर्ग बनाते है।'**

यावरुन आपल्या लक्षात आले असेल की विश्वनाटकाचा आधार भारतच आहे. सत्ययुगात भारतच पावन व कलियुगात भारतच पतित बनतो. त्यामुळे आपल्याला शुद्ध अहंकार असला पाहिजे की शिवबाबांच्या श्रीमतावर आपण भारताला स्वर्ग बनवित आहोत, ज्या स्वर्गात आपणच पुन्हा राज्य करु.

***

ज्ञान आपल्याला हेच सांगते की देह व देहाच्या संबंधापासून अलिप्त (न्यारे) राहून निरंतर शिवबाबांच्या आठवणीत रहा. आपला योग नॅचरल असला पाहिजे. आपले आचरण अतिशय मधुर असले पाहिजे. त्यासाठी आपण कधीही, कोणाच्या स्वभावाच्या वश होता कामा नये. ज्यांच्या स्वभावात गोडवा आहे त्यांनाच शिवबाबांचे प्रेम व ब्राह्मण परिवाराच्या दुवा (आशीर्वाद) प्राप्त होतात.

- दादी जानकीजी

सत्ययुग कितीसे दूर...

सत्ययुग कितीसे दूर,
मनुजा, मनी धरी से धीर ।।धृ।।

उषःकाल होण्याचा अवधि,
अगदी थोडा दूर।
संगमयुगही सरेल आता,
सखा श्रीकृष्ण नसे दूर।।१।।

झरे खळाळत मनात भरती,
उत्साहाचा पूर।
होतील आता फुले कळ्यांची,
पक्षी गाती मधुर।।२।।

रोज करी रे अमृतवेळा,
नाचे मनी मयूर।
शिवबाबांशी तार जोडिता,
होशी नयनीचा नूर।।३।।

ज्ञान देई धन, योग आरोग्य,
सुखवी मुरलीचे सूर।
व्याधिमुक्त जीवन जगण्याने,
होती चिंता दूर।।४।।

ड्राम्यावर, बाबांवर ठेवी निश्चय,
संशय करी रे दूर।
अंतमती सो गति व्हावया,
सराव करी भरपूर।।५।।

ब्र. कु. वसंत निंबाळकर
कागल (कोल्हापूर)

***

लवलीन स्थितीचा अनुभव करुया

ब्र. कु. आत्मप्रकाश, शांतिबन (आबू रोड)

संगमयुगात प्रेमाचा सागर परमात्मा आपल्याला प्रत्यक्ष भेटतो. आपली मोठ्या प्रेमाने पालना करतो. अहोरात्र आपल्यावर प्रेमाचा वर्षाव करतो. संपूर्ण कल्पात केवळ आताच आपल्याला परमात्म प्रेमाचा अनुभव होतो. बाकी साऱ्या कल्पात तो होत नाही. म्हणूनच आपण आजवर हे गीत गातो –

'तू प्यार का सागर है, तेरी एक बूँद के प्यासे हम'

आपली परमात्म प्रेमाची आशा आता संगमयुगात पूर्ण होते. आजवर आपण परमात्म प्रेमाच्या एका थेंबासाठी तडपत होतो. **आता मात्र तो प्रेमाचा सागरच आपला झाला आहे. यासारखे अहो सौभाग्य ते काय असणार? त्यामुळे आता आपण त्या प्रेमाच्या सागरी लवलीन स्थितीचा अनुभव करु या.** याचेच गायन भक्तिमार्गात आत्मा परमात्म्यात लीन होतो, अशाप्रकारे करण्यात आले आहे. वास्तविक आत्मा हा अजर, अमर, अविनाशी भूमिका बजावणारा आहे. तो कधीच परमात्म्यात लीन होत नाही अर्थात सामावून जात नाही. परंतु तो परमात्म्याच्या प्रेमसागरी लवलीन अवश्य होतो. तात्पर्य म्हणजे आता संगमयुगात प्रत्येक आत्म्याने लवलीन स्थितीचा अनुभव केला पाहिजे. याद्वारेच आपण निरंतर योगी, सहजयोगी, कर्मयोगी, रमतायोगी बनू शकतो.

परमात्म प्रेमाची महानता –

आपण या दुनियेत जे प्रेम अनुभवतो ते प्रेम स्वार्थवश केले जाते. कोणताही आत्मा दुसऱ्यावर प्रेम करतो, त्यामागे त्याचा काही ना काही स्वार्थ अवश्य असतो. परंतु परमात्म प्रेमात कुठलाही स्वार्थ नसतो. ते निस्वार्थ प्रेम असते. केवळ एक परमात्माच अशाप्रकारचे निस्वार्थ प्रेम करतो. आपले लौकिक माता-पिता देखील आपली पालना करतात. परंतु म्हातारपणी मुलांनी आपला सांभाळ करावा, ही त्यांची भावना जरुर असते. मुलांवर असलेले मातृऋण वा पितृऋण त्याने फेडावे ही अपेक्षा असते. परंतु परमात्मा पिता अशी कुठलीच अपेक्षा ठेवत नाही. म्हणून त्याला 'पालनहार' असे म्हटले जाते. लौकिक माता-पित्यांना मात्र पालनहार म्हटले जात नाही. परमात्म प्रेमाची दुसरी मुख्य विशेषता म्हणजे त्यामुळे आत्मा पावन बनतो. याउलट आत्मिक प्रेमामुळे कुठलाही आत्मा पावन बनत नाही. तो दिवसेंदिवस पतितच बनत जातो. द्वापरयुगापासून आपण स्वतःला देह समजून, देहधारी आत्म्यांशी प्रेम करीत आलो. त्याचा परिणाय कसा होत गेला हे आपण जाणतोच. कलियुगाचे अंती आपण सर्व आत्मे पतित बनलो. शेवटी आपणा सर्वांना पावन बनविण्यासाठी परमात्मा शिव पिता या सृष्टीवर अवतरीत होतात व सर्व आत्म्यांवर ईश्वरीय प्रेमाचा वर्षाव करतात. फलस्वरुप आत्मे पुन्हा पावन बनतात. अशाप्रकारे परमात्म प्रेम हे आत्म्यांना पावन बनविणारे आहे. तिसरी गोष्ट म्हणजे आत्मिक प्रेम हे मर्यादित स्वरुपाचे असते. त्याला काही सीमा असतात. कोणी स्वतःवर प्रेम करतो, कोणी आपल्या परिवारावर, तर कुणी समाजावर, विशिष्ट जाती वा धर्मावर ... परंतु परमात्म प्रेम हे बेहदचे प्रेम आहे. परमात्मा प्रेमाचा सागर आहे. तो विश्वातील सर्व आत्म्यांवर प्रेम करतो. महत्त्वाची गोष्ट म्हणजे परमात्म प्रेम आपल्याला दैहिक दुनियेपासून पार घेऊन जाते. आत्म्यांपासून प्राप्त होणारे

जे प्रेम असते ते मात्र या दुनियेत अधिक घट्टपणे बांधून ठेवते. म्हणूनच या दुनियेला 'मोह मायाजाल' असे म्हटले जाते. या मोहजाळ्यात प्रत्येक आत्मा हा अडकलेला असतो. त्यातून मुक्त होण्यासाठी तो प्रयत्न करीत असतो. परंतु अज्ञानवश तो त्यातून मुक्त होऊ शकत नाही. त्यातून मुक्त करणारा व मुक्तिधाममध्ये घेऊन जाणारा केवळ एक परमात्माच आहे. म्हणून त्याला लिबरेटर (मुक्तिदाता) व गाईड (मार्गदर्शक) म्हटले जाते. चौथी गोष्ट म्हणजे परमात्म प्रेम हे बिनशर्त (Unconditional) असते. आत्म्यांचे प्रेम मात्र तसे नसते. त्यात कुठली ना कुठली शर्त (condition) जरुर असते. आपण पहातो की आई-वडील आपल्या मुलाचा मोठ्या प्रेमाने सांभाळ जरुर करतात. परंतु तोच मुलगा जर मोठा झाल्यावर, वाईट गोष्टी करायला लागला तर त्याला घराबाहेर हाकलून देतात. कारण मुलाने आपला नाव-लौकिक वाढवावा ही जी त्यांची अपेक्षा असते, ती तो पूर्ण करत नाही. पाचवी गोष्ट म्हणजे ईश्वरीय प्रेमात सर्व संबंधांचा रस सामावलेला आहे. जसे निरनिराळ्या संबंधाचा अनुभव करण्यासाठी देहधारी मनुष्याला निरनिराळ्या देहधारींच्या संबंधात यावे लागते. याउलट सर्व आत्म्यांचे सर्व संबंध एक अविनाशी परमात्म्याशी असल्याने, त्याच्यापासून सर्व संबंधाचा रस प्राप्त होऊ शकतो. म्हणूनच संगमयुगात परमात्मा शिव पित्यापासून सर्व संबंधांची अनुभूती होते. याचेच गायन भक्तिमार्गात केले जाते. 'त्वमेव माता च पिता त्वमेव.'

परमात्म प्रेमाची प्राप्ती करण्यासाठी

जसे आज्ञाधारक मुलांना माता-पित्याकडून अधिक स्नेह प्राप्त होतो. तसेच परमात्मा शिव पिता देखील जी आत्मारुपी मुले आज्ञाधारक आहेत, प्रमाणिक आहेत, मनाने स्वच्छ, साफ, पवित्र आहेत. त्यांच्यावर अपार प्रेम करतो. याचेच गायन आहे 'सच्ची दिलपर साहेब राजी'. दुसरं म्हणजे जी मुले रुद्र ज्ञान यज्ञाची मनापासून सेवा करतात. आपला समय, श्वास, संकल्प, तन, मन, धन सफल करतात अशा मुलांवर शिवबाबा बलिहार जातात. त्यांना आपल्या हृदयसिंहासनावर बसवितात. त्यांनाच भविष्यात विश्वराज्य अधिकारी बनवितात. तसेच संगमयुगात राजयोगाच्या अभ्यासाने जे स्वयं पवित्र बनतात व दुसऱ्यांनाही पवित्र बनवितात, ते शिवबाबांचे मस्तकमणी बनतात.

आपण जाणतो की भक्त मीराला केवळ काही सेकंदासाठी श्रीकृष्णाचा साक्षात्कार झाला. फलस्वरुप ती श्रीकृष्णाच्या प्रेमात मग्न होऊन गेली, ज्याचे गायन केले जाते 'अैसी लागी लगन, मीरा हो गयी मगन। वो तो गली-गली हरी गुण गाने लगी।' आता संगमयुगात तर स्वयं परमात्मा, आत्मारुपी मुलांना भेटण्यासाठी साकार होतो. आपण ब्रह्मावत्स परमात्म मीलनाची अनुभूती करीत आहोत. त्यामुळे आपले मन-बुद्धी सदैव परमात्म प्रेमात लीन झाली पाहिजे. परिणामतः आपल्याला देह व देहाच्या दुनियेपासून बेहदचे वैराग्य अनुभवाला आले पाहिजे. 'एक बाप दुसरा न कोई' अशी आपली अवस्था असली पाहिजे. आपले प्रत्येक संकल्परुपी पाऊल श्रीमताप्रमाणे असले पाहिजे. परमात्म प्रत्यक्षतेचा ध्यास आपल्याला लागला पाहिजे. त्यासाठी ईश्वरीय सेवेची एकच धुन मनात असली पाहिजे. रोजच्या मुरलीतून शिवबाबांनी जी सेवा करायला सांगितली आहे, ती आपण केली पाहिजे. शिवबाबांनी दिलेले प्रत्येक डायरेक्शन (मार्गदर्शक सूचना) अंमलात आणले पाहिजे. तरच आपण त्यांची सपूत मुले म्हणवू. तात्पर्य म्हणजे मोठ्या आनंदाने आपल्या जीवनाची दोरी शिवबाबांच्या हाती दिली पाहिजे व सदैव त्यांच्या पावन स्मृतीत अतींद्रिय सुखाचा अनुभव केला पाहिजे. या अनुषंगाने एका हिंदी गीतातील बोल अतिशय हृदयस्पर्शी आहेत -

स्नेह प्यार की तुझसे बाबा, बाँधी है जीवन डोर।
दिल मेरा सदाही रहता, हर पल तेरी ओर।।

अशी परमात्म प्रेमात आपली मग्न अवस्था असेल तर साहजिकच आपल्या बोल व वर्माद्वारे परमात्म प्रत्यक्षता होईल.

लवलीन आत्म्याची निशाणी

परमात्म प्रेमात जो लवलीन आहे, त्या आत्म्याची मुख्य निशाणी असेल –'शिवबाबा हाच त्याचा संसार' असेल. या कलियुगी पतित व तमोप्रधान दुनियेपासून त्याला बेहदचे वैराग्य असेल. व्यक्ती आणि वैभव यापासून तो अलिप्त (न्यारा) असेल. फलस्वरुप तो शिवबाबांना प्रिय असेल. लवलीन आत्मा ईश्वरीय सर्व खजिन्यांनी (ज्ञान, गुण व शक्ती) मालामाल असेल. तो सर्व प्राप्ती स्वरुप असल्याने सदा संतुष्ट व सदा प्रसन्न असेल. तो दाता बनून सर्वांना ईश्वरीय खजिने वाटत राहिल. विश्व बंधुत्त्वभाव त्याच्या हृदयी सामावलेला असेल. तो सर्दव उमंग-उत्साहाच्या पंखांनी उडती कला अनुभव करेल.

दुसरं म्हणजे लवलीन आत्मा एकदम स्वच्छ (clean) असेल. त्याच्यात जरासुद्धा कमी-कमजोरीचा, विकारांचा जरासुद्धा कचरा नसेल. त्यामुळे आत्मा चमकत्या ताऱ्याप्रमाणे मस्तकात चमकेल. लवलीन आत्मा परमात्मा पित्याशी सदैव योगयुक्त असल्याने, मास्टर सर्व शक्तिवान स्थितीचा अनुभव करेल. तो जणू या सृष्टीवर अवतरीत आत्मा अर्थात फरिश्ता असल्याचा अनुभव होईल. आता समयानुसार आपली स्थिती अशी बनली पाहिजे. या स्थितीचे गायन अन्य धर्मात देवदूताच्या रुपाने केले आहे.

लवलीन स्थितीचा अनुभव करण्यासाठी

लवलीन स्थितीचा अनुभव करण्यासाठी परमात्म प्रेमाची पावन गंगा सदैव आपल्या मनात वहात राहिली पाहिजे. याचेच गायन केले जाते –

जैसी गंगा वाहे, तैसे ज्याचे मन।
भगवंत जाण, तयेजवळी।।

अशाप्रकारे परमात्म प्रेमाने परिपूर्ण मनात, सर्व आत्म्यांविषयी आपोआपच प्रेमाची भावना असते. कारण एका परमात्मा पित्याची मुले, आपण सर्व आत्मे भाऊ-भाऊ हा भाव त्याच्या अंतरी असतो. त्यामुळे त्याची स्मृती, वृत्ती-दृष्टी, बोल व कर्म आत्मिक बनते. तो स्वतःलाही आत्मा समजतो व आपल्या संबंध-संपर्कात येणाऱ्यांनाही आत्मा समजून व्यवहार करतो. त्याच्या मनात सर्वांच्या कल्याणाचीच भावना असते. त्यामुळे तो पुरुष (अर्थात आत्मा) व प्रकृती यांना सकाश (शक्ती) देण्याची मनसा सेवा करतो. त्याच्या हृदय सिंहासनावर केवळ एक परमात्मा विराजमान असतो. कारण तो हे जाणतो की त्याठिकाणी आपण जर आणखी दुसऱ्या कुणाला बसवले तर तेथून परमात्मा निघून जाईल. म्हणूनच गायन आहे – 'अपने दिल में एक दिलाराम (शिवबाबा) को ही बिठाओ।' तो शिवबाबांबरोबर सर्व संबंधाचा अनुभव करेल. तात्पर्य म्हणजे आपले मन वा बुद्धी या पतित दुनियेतील कुठलीही व्यक्ती अथवा वैभव यांच्यावर प्रभावित होता कामा नये. आपल्या डोळ्यात सुद्धा एक शिवबाबाच सामावलेला पाहिजे. या गोष्टींकडे जर विशेष लक्ष दिले तर आपल्याला लवलीन स्थितीचा अनुभव सदैव होत राहिल. सार रुपाने पुढील गीताचे बोल लक्षात ठेवा.

नयनों के दर्पण में बाबा, तुझको सदा ही देखू।
क्या से क्या बनाते हो, हर पल यही मैं सोचू।
मन आँगन में अब तो बाबा, खुशीयों मे नाचे मोर।
स्नेह प्यार की तुझसे बाबा, बाँधी है जीवन डोर।।

(भावानुवाद : ब्र. कु. ज्ञानेश्वर, धुळे)

***

पवित्रता व अपवित्रता यांचे मूळ कारण आहे - स्मृती. जर आपल्याला स्मृती असेल की ही देवी आहे तर ही स्मृती आपली दृष्टी व वृत्ती पवित्र बनवते. याउलट जर स्मृती असेल की ही स्त्री आहे तर ही स्मृती आपली दृष्टी व वृत्ती अपवित्र बनवते. पवित्रता हेच प्रत्येक आत्म्याच्या जीवनाचे लक्ष्य असले पाहिजे कारण पवित्र आत्माच या विश्व नाटकात परमसुखाचा अनुभव करू शकतो. त्याच्या जीवनात कधीही दुःख होऊ शकत नाही. त्यामुळेच संगमयुगी ब्राह्मण जीवन आहे, पवित्र बनण्याचे व बनविण्याचे.

- दादी गुलजारजी

(खास ब्रह्मावत्सांकरिता)

कल्पकल्पांच्या वैश्विक ड्राम्यात अंशमात्रही बदल होत नाही!

ब्र. कु. जगदीश दीक्षित, पुणे

बंधुनो, ह्या वैश्विक ड्राम्याचे ज्ञान यथार्थतः प्राप्त करून तीव्र पुरुषार्थ करणारे कित्येक ब्रह्मावत्स आहेत, तर हेच ज्ञान यथार्थतः प्राप्त न झाल्याने पुरुषार्थाच्या गतीत प्रतिबंधही निर्माण होऊ शकतो. आपण ड्राम्याविषयी कोणते संकल्प करतो ह्यावरच हा ड्रामा आपल्या पुरुषार्थात सहयोग देऊ शकतो तद्वतच प्रतिबंधही निर्माण करू शकतो. म्हणून ड्राम्याचे ज्ञान प्राप्त करताना त्याविषयी सकारात्मक दृष्टिकोन ठेवीत असताना सर्व संभ्रम दूर करून, ह्या हिरेतुल्य संगमयुगाच्या उर्वरित समयात तीव्र पुरुषार्थ करून, सकळ ब्रह्मावत्सांनी आपले अंतिम लक्ष्य अवश्य प्राप्त करावे. आपणा सर्वांनाच सत्ययुगाच्या आदिमध्ये जन्म प्राप्त करून नूतन कल्पाचा, नूतन युगाचा व ड्राम्याच्या प्रथम अंकाचा शुभारंभ करावयाचा आहे. चार युगांचा हा ड्रामा निरंतर फिरत राहण्यासाठी प्रत्येक कल्पाच्या संगमयुगावर परमात्म्याला यथार्थ सहयोग देणारे केवळ ब्रह्मा, सरस्वती व ब्रह्मावत्सच आहेत.

ज्ञानसागर परमात्म्याने वैश्विक ड्राम्याविषयी हे गुह्यरहस्य स्पष्ट केले आहे की, **हा अनादि ड्रामा कल्प-कल्प हुबहू पुनरावृत्त होत असतो. ह्या पुनरावृत्तीमुळे ड्राम्याला जाणणाऱ्या अथवा न जाणणाऱ्या कोणत्याही मनुष्यात्म्याचा कोणत्याही जन्माचा पार्ट कधीही बदलू शकत नाही. ड्राम्याच्या ह्या ज्ञानालाच परमात्म्याने 'सृष्टिचक्राचे ज्ञान' म्हटले आहे.**

बंधुनो, हे मानवी सृष्टिचक्र सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग व कलियुगातून निरंतर भ्रमण करीत आहे. भ्रमण चालू असतानाच सत्ययुगातील श्री लक्ष्मी नारायण अथवा त्रेतायुगातील श्री सीता राम ह्यांच्यासहित सर्व देवात्मे व मनुष्यात्मे ह्या ड्राम्यात आपल्या समस्त जन्मातील पार्ट बजविण्याअर्थ कल्प-कल्प बद्ध झालेले आहेत. फलस्वरूप असे कधी होत नाही की, ह्या कल्पात श्री सीतारामाचा पार्ट बजाविणारे आत्मे पुढील कल्पात श्री. लक्ष्मी नारायणाचा पार्ट बजावतील. अर्थात ह्या ड्राम्यात ज्याचा पार्ट त्यानेच कल्प-कल्प बजवायचा आहे तसा तो बजाविला जातो म्हणून हा ड्रामा अनादि, बनाबनाया, निर्धारित व हुबेहूब पुनरावृत्त होणारा आहे. ह्या अनादि ड्राम्याला यथार्थतः समजावून न घेतल्याने संभ्रमित मनात अनेक प्रश्नांची निर्मिती होते. जीवनातील भिन्न-भिन्न दुर्घटनांच्या कारणे होणाऱ्या अतीव दुःखामुळे मानवी मनात हा प्रश्न निर्माण होतो की, मी माझा ड्रामा बदलू शकतो काय? बंधुनो, हा वैश्विक ड्रामा आहे. ह्यातील प्रत्येक आत्म्याचे भिन्न-भिन्न जन्मांचे पार्ट निश्चित आहेत. ते बजावित असताना कधी सुख तर कधी दुःख हे प्राप्त होतच असते. जीवनातील हे सुखदुःखाचे चढउतार गृहीत धरूनच प्रत्येक आत्म्याच्या प्रत्येक जन्मातील पार्ट निश्चित झालेला असतो. फलस्वरुप कोणा एका आत्म्याचा पार्ट व त्याचबरोबर ड्रामाही कधी बदलू शकत नाही. The world drama never changes even slightly अर्थात वैश्विक ड्राम्यात अथवा विश्वाच्या इतिहासात कदापि अंशमात्रही बदल होत नाही. इतिहासाविषयी असे म्हटले जाते की, History repeats again अर्थात इतिहासाची पुनरावृत्ती होते. ह्या पुनरावृत्तीत थोडा जरी बदल झाला तरी संपूर्ण इतिहास बिघडला जाईल. विचार करा, ह्या कल्पात सिकंदराने पौरसाचा

पराभव केला आहे, परंतु पुढील कल्पात असे होणार नाही की पौरसाने सिकंदरचा पराभव केला. अशाप्रकारे ज्या घटना ह्या कल्पात घडून गेल्या आहेत त्याच घटना पुढील कल्पातही होणारच आहेत.

बंधुनो, प्रत्येक कल्पात पुनरावृत्ती होण्याऐवजी भिन्न-भिन्न घटना झाल्या असत्या तर ह्य विश्वाचा इतिहास लाखो वर्षांचा झाला असता. अर्थात तो लाखो वर्षांचा होऊ नये म्हणून प्रत्येक कल्पात होणाऱ्या घटना तंतोतंत पुनरावृत्त होत असतात. विश्वाच्या इतिहासाला केवळ ५००० वर्षांचीच मर्यादा रहावी म्हणून **प्रत्येक कल्पातील प्रत्येक युग हे १२५० वर्षांचेच असते. ह्या ५००० वर्षातच सर्व देवात्मे, धर्मात्मे व अन्य मनुष्यात्मे आपले निर्धारित असलेलेच पार्ट कल्प-कल्प बजावित असतात. त्यासाठीच तर ड्राम्याच्या पुनरावृत्तीचे अनादि व्यवस्थापन आहे.**

सर्व प्रकारच्या शुभाशुभ घटना ५००० वर्षांनी पुनरावृत्त होणारच आहेत परंतु त्याचा वर्तमान समयी विचार करणे म्हणजे संगम युगावरील बहुमुल्य कालावधी व्यर्थ घालविणे होय! विनाकारण विचार करून ड्रामा ना ह्या कल्पात बदलणार आहे, ना पुढील कल्पात बदलणार आहे. म्हणून काही झाले तरी ज्ञानी तू आत्मा मात्र 'नथिंग न्यू' हे दोनच शब्द उच्चारतो. हे दोन शब्द ड्राम्याच्या पुनरावृत्तीविषयी निश्चय व्यक्त करणारे आहेत. बंधुनो, ह्या **आश्चर्यकारक ड्राम्यात आदिपासून अंतापर्यंत कोणत्या आत्म्यांनी किती जन्म घ्यावयाचे, कोणी कोणती कर्मे करावयाची आहेत. तसेच कोणते संकल्प करावयाचे हे देखील निश्चित आहे. अर्थात हा ड्रामा मनुष्यात्म्यांच्या संकल्पासहित पुनरावृत्त होतो जर मनुष्यात्म्यांचे संकल्प प्रत्येक ५००० वर्षांनी पुनरावृत्त झाले नाही तर ड्रामा हुबहू पुनरावृत्त होतो; असे म्हणता येणार नाही.** ह्या ड्राम्यात एका आत्म्याच्या ज्या अनेक जन्मातील निर्धारित भूमिका अथवा पार्ट आहेत ते त्याला बजवावेच लागतात. त्या तीन चार तासांच्या नाटकात एकाच अभिनेत्याला एकाच नावाने दोन भिन्न-भिन्न पार्ट बजवावे लागतात. तद्वतच जीवनात भिन्न-भिन्न पार्ट बजाविताना कोणी रावाचा रंक अथवा रंकाचा राव, पुण्यात्म्याचा पापात्मा अथवा पापात्म्याचा पुण्यात्मा बनतो. अशाप्रकारे कोणा एका आत्म्याच्या जीवनात परिवर्तन झाले म्हणजे 'ड्रामा बदलला' असे म्हणता येणार नाही. त्याच्या जीवनात झालेले परिवर्तन हा ड्राम्याचाच एक भाग आहे. बंधुनो, एकाच जीवनात भिन्न भिन्न पार्ट असले तरी हे दोन्ही पार्ट गृहित धरूनच आत्म्याचा पार्ट निश्चित झालेला असतो. ह्या निश्चितपणामुळे व निश्चित असलेल्या पुनरावृत्तीमुळे ५००० वर्षांनीही त्याला असे दोन पार्ट बजवावेच लागतात.

जीवन परिवर्तन झाल्याने कोणत्या आत्म्याला दोन परस्पर विरोधी पार्ट बजवावे लागतील हे सांगता येणार नाही. ह्याचे उत्तम उदाहरण भूतपूर्व डाकू पंचमसिंगाचे देता येईल. एक ब्रह्माकुमारी भगिनी तुरुंगातील कैद्यांना ईश्वरीय ज्ञान देत असताना ते ज्ञान पंचमसिंगानेही श्रवण केले आणि तेथेच त्याने आपले जीवन परिवर्तन करण्याचा निश्चय केला. काही दिवसात हा क्रूरकर्मा वाल्याचा वाल्मिकी अर्थात संपूर्ण अहिंसक असा राजयोगी बनला! आजही तो ह्या ज्ञान यज्ञात कार्यरत आहे. त्याच्या वर्तमान जन्माच्या पार्टची नोंद अशीच असणार आहे की, काही वर्षापर्यंत हिंसक तर काही वर्षांनी त्याचा अहिंसा परमोधर्म पालन करण्याचा पार्ट निश्चित असेल त्याचे (पंचमसिंगाचे) हे दोन्ही पार्ट पाहून असे म्हणावे लागेल की, हा ड्रामा कोणाकडून कोणते कर्म करवून घेईल हे सांगता येणार नाही. अंततः ड्राम्याविषयी असे म्हणता येईल की, विश्वातील सर्व मनुष्यात्मेच नव्हे तर पाच तत्त्वेही ड्राम्याच्या अधीन असल्याने पाच तत्त्वांचे शरीर धारण करणारे मनुष्यात्मे कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे ड्राम्यात असलेलेच आपले पार्ट बजावित आहेत. ह्या शक्तिशाली व स्वयंचलित ड्राम्याच्या कारणे, संगमयुगावर पिताश्री ब्रह्माबाबांना सत्ययुगातील विश्वमहाराजन पद प्राप्त करणे, तर पवित्रतेच्या १४ कलाच प्राप्त झाल्याने श्रीरामाला आपला पार्ट कल्प-कल्प त्रेतायुगात बजाविणे अपरिहार्य

(पान क्र. ३० वर)

पुणे: 'सुखी जीवनाचा आधार–गीता' या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतांना नगरसेवक श्री. वागळे, ब्र. कु. नलिनी दीदी, वीणा दीदी व उषा दीदी.

सावेडी (अहमदनगर) : जा. महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाषण करतांना ब्र. कु. सुप्रभा दीदी, शेजारी उपमहापौर मालनताई ढोणे व अन्य.

भिवंडी : महाशिवरात्री निमित्त आयोजित शोभा यात्रेत सहभागी ब्र. कु. शिल्पा दीदी, बिंदू दीदी व डॉ. भारती बहेन.



पुणे (धनकवडी) : महाशिवरात्रीच्या कार्यक्रमात श्री. देशमुख, अध्यक्ष जि. रोटरी क्लब व त्यांच्या धर्मपत्नी यांना भेटवस्तू देतांना ब्र. कु. सुलभा दीदी व आरती बहेन.

मीरा रोड (मुंबई) : महाशिवरात्रीच्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्रसंगी उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती व ब्र. कु. रंजन बहेन.

तासगाव : 'महिला आरोग्य तपासणी' या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतांना डॉ. पाटील, डॉ. मीनल देशपांडे, ब्र. कु. डॉ. वैशाली बहेन व अन्य.

बार्शी : महाशिवरात्री निमित्त शिव ध्वजारोहण केल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. संगीता बहेन, श्री. गाडेकर अभियंता, श्री. बनसोडे व अन्य.

चिखली (पुणे): महाशिवरात्रीच्या कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना ब्र. कु. सुरेखा दीदी, पत्रकार श्री. शर्मा, श्री. लढ्ढा सर.

मुक्ताई नगर (जळगाव) : 'मानसिक स्वास्थ्य व राजयोग' या कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना डॉ. नीलेश पाटील, ब्र. कु. वर्षा बहेन व सुषमा बहेन.

लोणार (बुलढाणा) : 'राष्ट्रीय आयुष अभियान' या कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना आरोग्य अधिकारी डॉ. राठोड, ब्र. कु. मीरा दीदी व रजनी दीदी.

शिर्डी – एअरपोर्ट CISF इन्स्पेक्टर भ्राता ईश्वरलाल यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. भारती बहेन व पद्मा बहेन.

मलकापूर : ' मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक' या कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना ब्र. कु. वंदना व वर्षा बहेन, डेपो मॅनेजर श्री. कुलकर्णी व सर्व स्टाफ.

अंबाजोगाई : सेवाकेंद्रावर आयोजित कार्यक्रमात उपस्थित जेष्ट कार्यकर्ते भ्राता नंदकिशोरजी, ब्र. कु. महानंदा दीदी, सुनिता बहेन व अन्य मान्यवर.

वाशी (नवी मुंबई) : जा. महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मंचासीन ब्र. कु. शीला दीदी, ब्र. कु. निलम, समाजसेविका कलाना नाईक व अन्य.

खेड (रत्नागिरी) : सामाजिक कार्यकर्ते श्री. विवेक दांडेकर यांना ईश्वरीय भेटवस्तू देतांना संचालिका ब. कु. गीता दीदी.

कडेगाव (सांगली) : सांगली जि.प. अध्यक्ष श्री. संग्राम देशमुख यांना ईश्वरीय भेटवस्तू दिल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. मिनाक्षी व अश्विनी बहेन तसेच श्री. मोरे.

घणसोली (नवी मुंबई) : महाशिवरात्री निमित्त स्नेहमीलन कार्यक्रमात भाषण करतांना ब्र. कु. शीला दीदी, नगरसेविका सुवर्णा पाटील, नगरसेवक कमल पाटील, ब्र. कु. शुभांगी बहेन व भ्राता मनिष सोनी.



बोपोडी (पुणे) : महाशिवरात्री निमित्त खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या सदस्या सौ. पूजा मनिष आनंद यांचे स्वागत करतांना ब्र. कु. सुनिता बहेन व सुनिल भाई.

संगमनेर : 'मानसिक स्वास्थ्य व राजयोग' या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी उपसभापती नवनाथ अरगडे, डॉ. घोलप, ब्र. कु. भारती बहन, पद्मा बहेन व डॉ. योगिनी बहेन.

वरणगाव : महाशिवरात्री कार्यक्रमाचे प्रसंगी शिवस्मृतीत वसलेले नगराध्यक्ष सुनिल काळे, नगरसेविका रोहिणी जावळे, ब्र. कु. पद्मा बहेन व आश्विनी बहेन.

तासगाव : 'व्यक्तिमत्त्व विकास' या कार्यक्रमा अंतर्गत डॉ. राखी मोटवानी (अमेरिका), ब्र. कु. डॉ. वैशाली बहेन, प्राचार्य सुप्रिया बाणे व शिक्षक स्टाफ.

शिर्डी : 'हळदी कुंकू' समारंभात महिलांना ईश्वरीय संदेश देतांना ब्र. कु. पद्मा बहेन, भारती बहेन व डॉ. योगिनी बहेन.

सानपाडा (नवी मुंबई) : महाशिवरात्री कार्यक्रमात भाषण करतांना समाजसेवक भ्राता भापकर, शेजारी नगरसेविका संगीता बोऱ्हाडे, ब्र. कु. शीला दीदी, राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित भ्राता बाबुलनाथ मिश्रा, ब्र. कु. शुभांगी बहेन व अन्य.

शाहुवाडी : शालेय विद्यार्थ्यांना 'खरी स्वतंत्रता' या विषयावर संबोधन केल्यानंतर, राष्ट्रीय झेंड्याचे पूजन करतांना ब्र. कु. वर्षा व वंदना बहेन, सरपंच श्री. काळे व सर्व ग्रामसेवक.

फरिश्ता (देवदूत) स्वरुपाचा अनुभव करण्यासाठी विशेष ज्ञानबिंदू

ब्र. कु. गोदावरी दीदी, मुलुंड

• **फरिश्ता तोच बनतो, ज्याचा देह व देहाच्या दुनियेशी कुठलाही संबंध (रिश्ता) नसतो. ज्याचे सर्व संबंध एक शिवबाबांशीच असतात. शरीरात रहातांना सुद्धा केवळ सेवा अर्थ तो राहतो. दैहिक संबंधाच्या आधारे नाही. जेथे सेवेचा भाव असतो तेथे सदा शुभभावना असते. आणखी कोणताही भाव नसतो. तो अतिश्य अलिप्त (न्यारा) व सर्वांचा प्रिय (प्यारा) असतो.**

• फरिश्ता अर्थात ज्याचा संसार केवळ एक शिवबाबा आहे. निमित्त मात्र तो देहात असतो. देहाच्या संबंधीशी तो कार्य व्यवहारात येतो. परंतु कोणतेही आकर्षण (लगाव) मात्र नसते. आत्ता-आत्ताच कर्म करण्यासाठी देहाचा आधार घेतो व कर्म संपताच देह भानापासून अलिप्त (न्यारे) होतो.

• फरिश्ता अर्थात दिव्यता स्वरुप. दिव्यतेची शक्ती साधारणता स्वतःच समाप्त करते. जितकी-जितकी दिव्यतेची शक्ती आपल्या कर्मात आणाल तितके सर्वांच्या मनातून व मुखातून हे उद्‌गार बाहेर पडतील की ही व्यक्ती दर्शनीय मूर्त आहे. अनेक भक्त दिव्य दर्शनाचे अभिलाषी आहेत. त्यांच्यासमोर आपण स्वयं दिव्य दर्शनीय मूर्ती म्हणून प्रत्यक्ष होऊ. तेव्हाच सर्व आत्मे दर्शन प्राप्त करून प्रसन्न होतील.

• आपण 'ब्राह्मण सो फरिश्ता' आहोत, या कम्बाइण्ड (एकत्रित) स्वरुपाची अनुभूती आपल्याला विश्वासमोर साक्षात्कार मूर्त बनवील. 'ब्राह्मण सो फरिश्ता' या स्मृतीद्वारे चालता-फिरतांना, व्यक्त शरीराद्वारे व्यक्त दुनियेत पार्ट बजावतांना सुद्धा आपण ब्रह्मा बाबांचे साथी अव्यक्त वतनवासी फरिश्ता, अव्यक्त रुपधारी असल्याचा अनुभव होईल. हा अव्यक्त भाव आपला व्यक्त स्वभाव-संस्कार, बोलणे-चालणे सहज परिवर्तन करेल.

• फरिश्ता अर्थात प्रकाशाचे आकारी स्वरुप ज्यात कुठलीही व्याधी नाही, जुने स्वभाव-संस्कार नाहीत, देहाचे कुठले संबंध नाहीत. मनाची कुठली चंचलता नाही, बुद्धी कुठेही भटकत नाही. असे आपले प्रकाश स्वरुप अनुभव करा म्हणजे देहाचे स्वार्थी संबंध मोहाच्या दोरीने बांधणाऱ्या अनेक संबंधापासून सहजच मुक्त व्हाल.

• फरिश्ता स्थिती बंधनमुक्त स्थिती आहे. सेवेचे बंधन आहे. परंतु ती जितकी कराल तितके सदैव बंधनमुक्त रहाल. सदैव स्वतंत्र स्थितीचा अनुभव होत राहील. शरीर व कर्माच्या अधीन नाही. जरी देहधारींच्या संबंधात आले तरी अव्यक्त वतनमधून आले, संदेश दिला व लगेच अव्यक्त वतनमध्ये उडत गेले.

• फरिश्ता स्थितीचा अनुभव करण्यासाठी विशाल हृदय हवे. तसेच बेहदची स्मृती हवी. जेथे बेहदची स्मृती आहे. तेथे कुठल्याही प्रकारची हद्द आकर्षित करु शकत नाही. कर्मातीतचा अर्थच आहे - सर्व प्रकारच्या हद्दच्या स्वभाव-संस्कारांपासून अलिप्त (अर्थात न्यारा).

• **सदैव ही स्मृती ठेवा की शिवबाबा करविता प्रत्येक कर्म माझ्याद्वारे करवित आहे. म्हणजे कुठलेही ओझे वाटणार नाही. शिवबाबांच्या डायरेक्शन अनुसार प्रत्येक कर्म करत चला तर कर्म ही श्रेष्ठ तसेच कर्माचे फळ म्हणून सदा खुशी, सदा हलकेपणा व फरिश्ता जीवनाचा अनुभव होत राहील.**

• आपण ब्रह्मावत्स शिवबाबांचे बनलो व आपले सर्व काही शिवबाबांना समर्पण केले. त्यामुळे केवळ एक शब्द, लक्षात ठेवा - सर्व काही शिव बाबांचे आहे, माझे काहीच नाही. जेथे 'माझे' शब्द

येईल तेथे 'तुझे' शब्द वापरा म्हणजे मनावर जरासुद्धा ओझं पडणार नाही.

• **फरिश्ता अर्थात डबल लाइट. त्यामुळे संपूर्ण शरीर प्रकाश स्वरुप (लाईट हाऊस) व भृकुटी सिंहासनावर विराजित आत्मा शक्तीस्वरुप (माईट हाऊस). फरिश्ता सदैव चमकत असल्याने सर्वजण त्याच्याकडे स्वतःच आकर्षित होतील. फरिश्ता सदैव उच्च स्थितीत असतो. म्हणूनच फरिश्त्याला पंख दर्शविण्यात येतात. त्यामुळे जेव्हा आपल्याला शिवबाबा मिळाले, उच्च स्थिती मिळाली तर सदैव उडत रहा व बेहद सेवा करीत रहा.**

• फरिश्ता बनणे अर्थात साकार शरीरधारी असूनही प्रकाश स्वरुपात रहाणे अर्थात सदैव बुद्धीद्वारे उच्च स्थितीत रहाणे. त्यामुळे आपण जितके स्वतःला प्रकाश स्वरुप आत्मा समजू तितका आपल्याला चालता-फिरतांना फरिश्ता स्वरुपाचा अनुभव होईल अर्थात प्रकाशाचे शरीरधारी फरिश्ता बनून चालत असल्यासारखे वाटेल.

• **फरिश्ता अर्थात ज्याचा देहभानाशी संबंध नाही. देहभानाशी पूर्णतः संबंध तुटणे अर्थात फरिश्ता बनणे. (देहाशी नाही तर देहभानाशी संबंध तुटणे) जसे बापदादा जुन्या शरीराचा (दादी गुलजारजींच्या) आधार घेतात. परंतु त्याच्यात ते फसत नाहीत. तसेच कर्म करण्यासाठी शरीराचा आधार घ्या. परंतु नंतर आपल्या फरिश्ता स्वरुपात अथवा निराकारी स्वरुपात स्थित व्हा.** ***

प्रभुप्रेमात मग्न होऊन जा. कारण

१. शिवबाबांनी आपल्याला अपार प्रेम दिलं.
२. आपल्याला सर्व शक्ती प्रदान केल्या.
३. आपल्याला हृदय सिंहासनावर बसवलं.
४. आपल्याला ज्ञान, गुण व शक्तींचे भांडार दिले.
५. विकारांपासून मुक्त करून, निर्मळ बनविले.
६. आपल्याला चिंता व विकर्मांच्या ओझ्यातून मुक्त केले.
७. आपल्याला अज्ञान निद्रेतून जागे केले.
८. आपण गमावलेले स्वराज्य प्रदान केले.
९. आपला ज्ञान रत्नांनी रोज शृंगार केला.
१०. आपल्याला जगण्याची कला शिकवली.
११. आपला मार्ग निष्कंटक बनवला.
१२. आपल्याला काट्यापासून फूल बनविले.
१३. आपल्याला स्वमानाच्या सिंहासनावर बसविले.
१४. रोज आपल्या दारी येऊन आपल्याला तृप्त केले.
१५. आपल्याला सर्व प्रकारच्या भयातून मुक्त केले.
१६. आपल्याला दिव्य बुद्धी प्रदान केली.
१७. आपला स्वीकार केला व सेवेत लावलं.
१८. जन्म-जन्मांच्या भक्तीचे फळ ज्ञान दिलं.
१९. अनेकानेक वरदानांनी आपलं जीवन शृंगारलं.
२०. मायेच्या प्रत्येक वारापासून रक्षण केलं.
२१. आपल्याला मास्टर सर्वशक्तिवान बनवलं.
२२. आपल्याला त्रिनेत्री, त्रिकालदर्शी व त्रिलोकीनाथ बनवलं.
२३. आपल्या श्रेष्ठ भाग्याची लेखणी आपल्या हाती दिली.
२४. या जगात आपला गौरव वाढवला.
२५. आपल्या प्रत्येक पावलावर त्याने सोबत दिली.
२६. आपली सर्व दुःख दूर करून, सुखस्वरुप बनवलं.
२७. आपल्या सर्व मनोकामना पूर्ण केल्या.
२८. आपल्याला स्वर्गाचे राज्यभाग्य प्रदान केलं.
२९. आपल्याला नरापासून नारायण बनण्याचे श्रेष्ठ कर्म शिकवले.
३०. आपल्याला मुक्ती व जीवनमुक्तीचे वरदान दिले.

सहनशीलता... एक अद्‌भुत शिल्पकार...

(भाग–१)

ब्र. कु. हेमंतभाई, शांतिवन (आबू रोड)

जपानचे सम्राट यामातो यांचे एक मंत्री होते 'ओ–चो–सान'. त्यांच्या परिवारात जवळजवळ एक हजार सदस्य होते. परंतु सर्व कुटुंबियांमध्ये वाखणण्याजोगी एकता होती. त्याचे सर्व सदस्य एकोप्याने राहत व मिळून मिसळून एकत्र भोजन करीत. त्यांच्या त्या विशाल परिवाराच्या कथा कहाण्या दूर–दूर पर्यंत पसरल्या होत्या. ओ–चो सानच्या परिवाराच्या एकतेची कहाणी सम्राट यामातोच्या ही कानापर्यंत पोहचली. खरं काय ते जाणण्यासाठी एके दिवशी सम्राट स्वतः मंत्र्यांसोबत त्यांच्या घरी पोहचले. स्वागत, सत्कार व शिष्टाचार संपल्यावर सम्राट यामातोंनी विचारलं, 'ओ–चो, मी तुमच्या कौटुंबिक एकतेची गौरव गाथा व सौख्य समृद्धीची कथा ऐकलीयं. तुमच्या परिवारात एक हजाराहून जास्त सदस्य असून ही इतकी माणसं आपआपसात न भांडता कशी काय राहतात? सर्वांच्या मजबूत घनिष्ट अन् अटूट संबंधाचें व अखंड परिवाराचे रहस्य कृपा करून सांगाल काय? ओ–चो–सान वृद्धावस्थेमुळे जास्त बोलू शकत नव्हते. म्हणून त्यांनी नातवाला खुणवून कागद पेन आणायला सांगितले. त्यांनी थरथरत्या हातांनी कसेबसे शंभर शब्द लिहिले व कागद सम्राटला दिला. सम्राट यामातो मनातली उत्सुकता दाबू शकले नाहीत. उताविळपणे सम्राटांनी भराभरा कागद वाचायला सुरुवात केली व वाचता वाचता ते आश्चर्यचकित झाले. कारण **त्या कागदावर फक्त एक आणि एकच शब्द शंभर वेळा लिहिला होता आणि तो शब्द होता – 'सहनशीलता'.**

खरोखरचं ओ–चो–सान ह्यांच्या परिवारातील सदस्यांची 'सहनशीलतेची' जादू मोठी महानच मानावी लागेल. म्हणून तर ऐवढे भले मोठे कुटुंब असूनही आपापसात 'तू–तू', 'मी–मी' न होता सर्व कसे गुण्यागोविंदानं नांदत होते. नांदू ही का नयेत, कारण सहनशीलता मुळी आहेच असा चमत्कारी गुण. जिथे जन्मजात सहनशील असलेला एकन्‌एक सदस्य छोट्या मोठ्या गोष्टी हसत–हसत सोसत असेल, बऱ्यावाईट कडूगोड गोष्टींना प्रत्येक जण प्रेमापोटी पचवत असेल, ज्या कुटुंबात विषम स्वभाव असूनही सहजपणे विविध संस्कारांची रास मिळवत असतील. एकमेकांचा हेवा–दावा न करता, सहन करण्यात सारेच तरबेज असतील व त्यात ही विशेष म्हणजे आपल्यांसाठी झिजणे–मरणे जिथे कुणां शिकवावे लागत नसेल–अशा सहनशील सदस्यरुपी शिलांनी बांधलेल्या मजबूत किल्ल्यारुपी कुटुंबाला कोण बरं धाराशाही पाडू शकेल? **ज्या कुटुंबात प्रेमळ सहनशील माणसं जन्मास येतात, त्या घरी जणू स्वर्गच दारी येतो.**

आज चहुकडे नजर फिरवली तर समाजात काय दिसतं बरं? सर्वत्र सहनशीलतेचा दुष्काळच ना! सहनशीलतेच्या कमतरते मुळेच संबधांच्या चिंधड्या चिंधड्या होतांना दिसतात. त्यातच कुटुंबियांमध्ये रतीभर ही सहनशीलता शिल्लक उरली नसेल तर नाना नात्यांनी गुंफलेलं बालगोपाळांनी बहरलेलं गोकुळासारखं घर विखरायलां क्षणभर ही वेळ लागत नाही. आजच्या कौटुंबिक कलहाचे, मानसिक उद्वीग्नतेचे, टेन्शन, ताण–तणावाचे व व्यक्तिगत अशांतीपासून वैश्विक युद्धापर्यंत सर्वच समस्यांच्या तळागाळाशी जाऊन पाहिले तर फक्त आणि फक्त सहनशीलतेचा अभाव दिसतो. कुणी वावगे, नावडते अपशब्द

बोलले, अत्याचार-दुराचार-दुष्प्रचार केला, तर जागी होते बदला घ्यायची दुर्भावना. परंतु बदला घेणे काही कायमस्वरुपी समाधान नव्हे! विटेचे उत्तर दगडाने देणे सोपे असले तरी ते मनातली आग बाहेर काढणारे, तात्पुरते समाधान ठरते. दगडाचा मार खाणारा ही उत्तरादाखलं धोंडा मारु शकतो. मग एकदा का दगडफेक सुरु झाली तर ती दगडफेक डोकी फोडून व जीव घेऊनच थांबते. त्याने होतो सर्वनाश. परंतु सर्वनाश टाळणारे कोणते ब्रह्मास्त्र असेल तर ते सहिष्णुता होय! सहनशीलतेनेच कौटुंबिक-सौख्य व जगात शांती संभव होते.

सहनशीलतेचा अर्थ-मतितार्थ, मर्म-महत्त्व समजल्या-उमगल्याशिवाय सहनशील बनणं शक्य तरी आहे का? **खरं तर सहनशीलता म्हणजे दुःख देणाऱ्यालाही माफ करणे आणि त्याचे भले करणे, ग्लानी करणाऱ्याविषयी शुभचिंतन करणे, त्यांच्याविषयी मनात मंगलभावना भरणे, त्रास देणारा मनाने दीन-दुबळा आहे असे समजून किंवा सतविणारा ईर्षा-द्वेष, मद-मत्सर, क्रोध इत्यादी विकारांच्या वशीभूत आहे असे मानून त्यास हृदयापासून क्षमा करणे. आजारपणात धैर्य धरून खुश राहणे, नुकसान झाल्यावरही मानसिक संतुलन टिकवून ठेवणे ही सुद्धा सहनशीलता होय.** दयाळू-मायाळू देवासारखं मनी धैर्य, उरी प्रेम व बुद्धिस विशाल बनवून, विविध व्यक्तींच्या नाना संस्कारांशी ताळमेळ घालणे व चांगला वाईट कोणी कसा ही असो, काळजाला आभाळा ऐवढं मोठं करून गुणासोबत अवगुणाला पोटात घालणे ही सहनशीलता होय. हा आपला तो परका हा दुजाभाव वा भेदभाव न करता सर्वांवर समान स्नेह सुमनांची उधळण करणं व अपकारी वर ही उपकार करणे सुद्धा सहनशीलताच होय.

सहनशीलताच विरोधी प्रवृत्ती, विकृत मनोवृत्ती, विषम परिस्थितींमध्ये ही अंगद सारखे अचल, अडोल राहण्याचे अक्षय बळ देते. **जो ह्या दिव्यगुणास धारण करतो, तो जगी महान ठरतो. मानवाला देवत्व देणारा महान गुण आहे सहनशीलता.** हे शीलवानाचे सुंदर भरजरी वस्त्र व चारित्रसंपन्न मानवाचे अलौकिक आभूषण व देवतांचा दिव्य शृंगार आहे. जो दुसऱ्यांचे टोमणे-कुजकी बोलणी हसत हसत ऐकतो, तोच नेहमी हर्षितमुखाने व शांत चित्ताने भयक्रांत करणाऱ्या विपत्तींना ही तोंड देऊ शकतो. कुणी टाकून बोलले, कितीही तिरस्कार केला, पदोपदी अपमानाचे कडू घोट पाजले, कमी लेखले, तरीही कर्मयोगी बनून कर्मपथावर सहनशीलतेने पाऊल पुढे टाकणारा, सहनशीलतेच्या जादूने क्रूर स्वभावाच्या व्यक्तीचे हृदय परिवर्तन करतो व जनता जनार्दनाचे अनमोल आशीर्वाद पदरी घेऊन, विश्व-सम्राटाचे पद प्राप्त करतो. सहन करणाराच शहनशाह व बेगमपुरचा बेफिकीर बादशहा बनतो त्यावर देव ही दुवांची दौलत उधळतो. त्याचेच बहुकालानंतर का होईना मोल होते.

परंतु ह्या उलट लाजाळूच्या झाडाप्रमाणे निंदकाच्या दोन चार कटू वचनांनी जो क्षणार्धात हिरमुसतो, अशाच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता लोप पावते. तो शेकडोवेळा मनाने मरतो. पदरी सहनशीलता नसलेली व्यक्ती रुपवान, धनवान, बलवान असूनही कोणत्याही क्षेत्रात सदाकाळची सफलता प्राप्त करू शकत नाही. असहनशीलतेमुळे रडणे-रुसणे-रागावणे व चीड-चीड करण्याचा संस्कार प्रबल होतो. त्याने मधासारखी गोड जीवाभावाची माणसं कोसभर दूर जातात. आयुष्याच्या छानशा प्रवासात साथ देणारी व हृदयांना जोडणारी रेशीम नाती तुटायला वेळ लागत नाही. ह्या विपरित जो समजदार बनून निंदा-नालस्ती सोसत-सोसत, मन मोठं करून, अपमान-अपकारांना सहज पचवतो. शिवीरुपी शूलं (काटे), मज मुर्तिस अर्पित केलेले फूल आहे असे मानून कटू वचनाचे उत्तर हसत मुखाने मधुर वचनाने देतो. तोच जीवनाच्या संघर्षात विजयश्रीचे वरण ही करतो.

हिमालयाचे गौरी शिखर गाठायला निघालेल्या गिर्यारोहकाला ही जीवघेणा थंडी-वारा व ऊन पाऊस सोसावा लागतो. सीमेवरच्या शूर सैनिकांना आतंकाला सहन करत, शत्रूशी झुंज दिल्याविना कंठी जयमाला कुठे पडते?

पायाखाली तुडविली जाणारी माती, कुंभाराचा मार खाऊन, अग्नीत तापून, सहनशीलतेमुळे माठ बनून थंड पाणी देते. असंच सहनशीलतेने मानव माठासारखा परिपक्व सुख देणारा सुखदेव बनतो. डोंगरमाळी अंकुरलेले इवलेसे 'बी' विषम वातावरणाला तोंड देऊनच विराट वटवृक्ष बनते. दगड मारल्यावर निर्जीव झाड ही गोड फळ देत-देत सहनशीलतेचा धडा शिकवतं. आगीत सोनं शुद्ध होऊन आकर्षक दागिन्याचं रुप धारण करतं, तसंच परिस्थितीच्या भीषण अग्नीत होरपळल्यावर जीवाचं सोनं होतं व व्यक्तिमत्वाला स्वर्णाभूषणासारखं सुरेख रुप मिळतं. म्हटले ही जातं '**सहना गुणों का गहना बनना है।**' सतत होणाऱ्या अग्नी परीक्षांना धर्मपरायण होऊन पार केल्यानेच, चारित्र्य सीतामाते सम पावन होतं, विश्व क्षितीजावर आत्मा उज्ज्वल होऊन ध्रुव ताऱ्या समान लख्ख चमकतो.

सहन केल्याविना लोकी-परलोकी कधी कुणां काही लाभले तरी काय? ह्या विशाल विश्वात कुणी देवात्मा-धर्मात्मा-महात्मा, भक्त-संत-महंत, साधक-धर्मस्थापक-समाजसुधारक, ज्ञानी-ध्यानी-दानी-वरदानी, राजा-महाराजा, नेता-अभिनेता म्हणून ह्या भूमंडळी जगप्रसिद्ध झाले आहेत. ते तर सहनशीलतेच्या परमप्रतापी बळानेच. शिरी काटेरी ताज देऊन क्रॉसवर चढविणाऱ्या अधमांची क्रूरता सहन करून येशू धर्मस्थापक बनले. भक्त मीरा विषाचा प्याला पिऊन अमर झाली. वाळीत टाकणाऱ्या रुढीवादी, मदांध ब्राह्मणांच्या बहिष्काराला तोंड देत, जगासं प्रेम-धर्म देणारे ज्ञानेश्वर 'माऊली'च्या उपाधीने संताद्वारे पूजले गेले. स्त्री शिक्षणाचा पाया रचणारे ज्योतिबा फुले कुत्सित हेटाळणी सोसून 'महात्मा' ठरले. छत्रपती शिवाजी महाराज शत्रूसोबत स्वजनांच्या त्रास सोसत, रयतेचं मन जिंकणारे प्रजेच्या हृदय-सिंहासनाचे राजे झाले. इंग्रजांच्या हिंसक लाठीमारास सहिष्णुतेच्या ढालीने लढा देत बापू गांधी 'राष्ट्रपिता' बनले.

समाजात मोठा मान-मर्तबा असूनही दादा लेखराजांना परमात्म्याचे साकार माध्यम बनल्यावर, समाज कंटकाचा भयानक विरोध सहन करावा लागला. प्रतिष्ठित, सन्माननीय बेदाग जीवनावर नको ते कलंक ही लागले. एकदा कोलकात्यामध्ये विकृत मानसिकतेने ग्रसित व्यक्तीने वर्तामनपत्रात छापले की, 'एक प्रतिष्ठित सोन्या-हिऱ्यांचा व्यापारी म्हणतो मी श्रीकृष्ण भगवान आहे, मला १६ हजार पटराण्या हव्यात. आता त्याला तीनशे राण्या मिळाल्यात, बाकीचींचा तो शोध करीत आहे' हे वाचल्यावर निर्मलशांता दादीजींनी पिताश्रींना पत्राने विचारले, 'बाबा, मी त्याच्यावर मानहानीची केस करू का? **तेव्हा बाबांनी उत्तर दिले, 'मुली कुणी आपल्या मुलावर कधी केस करतो का, खरंच ब्रह्माबाबांनी आपल्या चारित्र्यावर डाग लावणाऱ्यांना ही पोटचं पोर मानले व दंभी दुराचारींच्या दुष्प्रचाराला पोटात पचवून 'प्रजापिता' बनले. कलियुगी विकारी व्यक्तींच्या विरोधाच्या वादळाला शक्तिशाली स्थितीने पराभूत करणारे 'न भूतो न भविष्यति' असे 'सहनशीलतेचे महामेरु' सिद्ध झाले.**

एक मुलगा मूर्ती घडणाऱ्या कलाकारास न्याहाळत होता. उत्सुकतेने त्यानं विचारले, 'काका, तुम्ही मूर्ती बनवताय ना!' तेव्हा कलाकारानं मानेनेच नकार देत नाही म्हटलं, थोड्या वेळाने मुलाने परत तोच प्रश्न केला, तेव्हा ही शिल्पकार महणाला - 'नाही'. तिसऱ्यांदा उत्तेजित होऊन मुलगा बोलला, 'तुम्ही बनवत तर आहात मूर्तीच, पण का म्हणून सांगताय की तुम्ही मूर्ती नाही बनवत. तेव्हा प्रेमाने शिल्पकार उत्तरला, 'बाळा ह्या दगडात मूर्ती आधीच लपलेली आहे. मी तर फक्त त्या मूर्तीवर नको असलेला दगडाचा भाग काढतोयं, मूर्तीवरून नको असलेला दगड निघताच आतली मूर्ती प्रकट होईल. **परमात्मा ही श्रीमतरुपी हातांनी, ज्ञान-योगाच्या कर्मकुशल हातोडीने, आत्म्यावरची टाकावू तमोप्रधान संस्कारांची दगडी खपली काढतो अन् सत्ययुगी सतोप्रधान संस्कारांना तराशून बाहेर काढतो.** आत्म्याचे पवित्र्यतेच्या तेजाने नटलेले, दैवीगुणांनी सजलेले रुप प्रत्यक्ष करतो.

(पान क्र. २७ वर)



जो निर्भय आहे, तोच खरा ज्ञानी

ब्र. कु. बाल्भाई, शांतिबन (आबूरोड)

भय हा मनुष्याचा सर्वात मोठा शत्रू आहे. बऱ्याचदा तो असुरक्षिततेच्या भावनेतून निर्माण होतो. कित्येकदा तो जीवनातील शुभ गोष्टींचा वियोग व अशुभ गोष्टींच्या संयोगाची आशंका जेव्हा निर्माण होते तेव्हा भय वाटू लागते.

कधी-कधी घटनेची तीव्रता कमी असते. परंतु त्याविषयी नकारात्मक विचार करून आपण मनात भीती निर्माण करतो. उदा. घरातून बाहेर पडलेल्या मुलाची आई भीतीपोटी इतकी काळजी करते की जोपर्यंत तो घरी परत येत नाही तोपर्यंत तिचा जीव भांड्यात पडत नाही. ती सारखी विचार करीत असते की काही अकल्पित घटना तर घडली नसेल ना? त्यामुळे ती त्याला सारखा फोन करायचा प्रयत्न करीत असते. परंतु कुठे-कुठे नेटवर्कचा प्रॉब्लेम असतो. कधी-कधी मोबाईलची बॅटरी संपलेली असते. त्यामुळे मुलाशी आईचा संपर्क होऊ शकत नाही. अशा परिस्थितीत मुलाच्या मोहापायी आईचे विचारचक्र आणखीनच जोरात फिरायला लागते. यातूनच तणावजन्य परिस्थिती निर्माण होते म्हणूनच म्हटले जाते 'भीत्यापोटी ब्रह्मराक्षस'.

माणसाच्या मनात अनेक लहान-मोठ्या कारणांमुळे भीती बसलेली असते. ती संपता संपत नाही. **कोणाला अंधाराची भीती वाटते, तर कोणाला पाण्याची, कुणाला पैसा चोरी होण्याची, कुणाला अपघाताची, कुणाला अपमानाची, कुणाला आजारपणाची, कुणाला वृद्धापकाळाची, कुणाला परीक्षेची, जिवलग व्यक्ती दुरावण्याची, अनोळखी व्यक्ती व जागेची भीती, कुत्र्याची भीती, काही काहीना तर झुरळ, पाल यांचीसुद्धा भीती वाटते.** काही बायका तर झुरळ पाहून पळत सुटतात. सर्वात मोठी भीती जर अज्ञानी माणसाला वाटत असेल तर आहे मृत्यूची भीती. याविषयी शास्त्रांमध्ये एक दृष्टांत आहे. एकदा यमराजाने आपल्या दूतांना एकाच वेळी २ हजार लोकांना मारुन आणायला सांगितले. अर्थात यमसदनाला आणायचा आदेश दिला. त्यानुसार यमदूत आपली जबाबदारी पार पाडून परत आले. परंतु आश्चर्य असे झाले की दूतांनी २००० ऐवजी ४००० लोकांची प्रेते आणली होती. ते पाहून यमराजाने विचारले की हे असे कसे घडले? तेव्हा दूतांनी उत्तर दिले की आम्ही २ हजार लोकांनाच मृत्यू दिला होता. परंतु त्यांचा मृत्यू पाहून आणखी २ हजार लोकांचा मृत्यू झाला. म्हणून त्यांना देखील सोबत आणावे लागले.

वास्तविक मृत्यूची भीती ही इतकी भयानक आहे की आपल्या निकटच्या संबंधींना आपल्या डोळ्यासमोर निरोप देणे, ही कल्पनाच लोकांना सहन होत नाही. वास्तविक जीवनाचे सत्य माहित असूनही ते त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. अज्ञानी मनुष्याला याचा विसर पडतो की मी देह नसून, चैतन्य आत्मा आहे. मी अजर, अमर, अविनाशी आहे. मी एक शरीररुपी वस्त्र सोडून दुसरे धारण करीत असतो. गीतेतही दुसऱ्या अध्यायात सांगितले आहे -

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि, नैनं दहति पावकः।
नच्चैनं क्लेदयंन्त्यापो, न शोषयति मारुतः।।२३।।

(अर्थात आत्म्याला शस्त्रांनी कापता येत नाही, तसेच त्याला अग्नीने जाळता येत नाही, त्याला पाण्याने भिजविता येत नाही आणि वाऱ्याने त्याला सुकविता येत नाही.)

परंतु मनुष्य आपली स्वतःची

ओळख विसरतो व जीवनभर स्वतःला देह समजून व्यवहार करतो. त्यामुळेच तो देह व देहाचे संबंध यांच्या मोहजाळात अडकून रहातो. एवढेच नव्हे तर जन्मजन्मांतर तो त्या जाळ्यात अधिकच फसत जातो. वास्तविक मनुष्याला बुद्धिवान प्राणी म्हटले जाते. परंतु याबाबतीत मात्र तो बुद्धिहीनसारखा वागतो. त्यामुळे मनुष्य मृत्युच्या भीतीने सदैव चिंतीत वा दुःखी असतो.

एक माताजी या विचाराने नेहमी चिंतीत असायची की मेल्यानंतर सर्वजण मला स्मशानात घेऊन जातील आणि तेथे एकटेच सोडून देतील. हा एकटेपणा मी सहन करु शकणार नाही. या प्रश्नाचे उत्तर मिळावं म्हणून ती एका संताकडे गेली व त्यांना आपली व्यथा सांगितली. त्यावेळी त्या संत महात्माने तिला समजावून सांगितले की, 'माताजी, स्मशानात तू नसणार फक्त हे शरीररुपी वस्त्र असेल. बाकी तू तर देवाघरी जाशील. त्यावेळी माताजींना आपल्या खऱ्या स्वरुपाची ओळख झाली. परिणामतः मृत्यूची भीती थोडीशी कमी झाली. तथापि ती पूर्णतः गेली नाही कारण देहाच्या संबंधाच्या मोहजालात ती अडकलेलीच होती ना! यातून मुक्त होण्यासाठी आवश्यक आहे- ईश्वरीय ज्ञान. ते ज्याला प्राप्त आहे तोच 'नष्टोमोहा स्मृतिर्लब्धा' बनू शकतो, याविषयी एक सत्य घटना आपण पाहू या.

महात्मा गांधी यांच्या पत्नी कस्तुरबा यांनी आपल्या देहाचा त्याग केला. जेव्हा त्यांचे अंतदर्शन करण्यासाठी महात्मा गांधींना बोलविण्यात आले, गांधीजींनी त्यांचे दर्शन घेतले. तेव्हा गांधींजींच्या डोळ्यातून अश्रू आले. कस्तुरबांच्या जाण्याचे दुःख ते सहन करु शकले नाहीत. गांधीजींच्या मुखातून उद्गार बाहेर पडले, 'कस्तुरबा! मी तुझ्या शरीराची राख होताना पाहू शकत नाही.' यावर एका कवीने म्हटले, 'हिमालय भी आज रो पडा।'

आता अशाच प्रकारची दुसरी एक सत्य घटना पहा - पिताश्री ब्रह्माबाबांच्या धर्मपत्नी जशोदा यांनी सन १९६१ मध्ये मुंबईत शरीर सोडले. त्यावेळी त्यांच्याजवळ निर्मलशांता दादी (पिताश्रींची कन्या) होत्या. शरीर सोडण्यापूर्वी जशोदा मातांनी दादींना मुरली वाचायला सांगितली. दादीजी त्यांना मुरली ऐकवित होत्या. मुरली ऐकता-ऐकता जशोदा मातांनी निर्मलशांता दादींच्या मांडीवर डोके ठेवले व आपल्या शरीराचा त्याग केला. दादीजींनी लगेचच मधुबनमध्ये पिताश्रींना फोनवर ही गोष्ट सांगितली. तेव्हा पिताश्रींनी लगेचच फोनवर सांगितले, ''बच्ची, कोई बात नहीं। तुम्हारी अम्मा और मेरी बीबी थी। अम्मा मरे तो भी हलुवा खाना और बीबी मरे तो भी हलुवा खाना।''

यावरुन आपल्या लक्षात येईल की **राष्ट्रपिता महात्मा गांधीसुद्धा आपल्या पत्नीच्या मृत्यूप्रसंगी शोकाकुल झाले. परंतु शिव परमात्म्याने ज्यांना प्रजापिता म्हणून संबोधले ते ब्रह्माबाबा मात्र आपल्या पत्नीच्या मृत्यूप्रसंगी जराही शोकाकुल झाले नाहीत. त्यांची अवस्था एकरस होती. एवढंच नव्हे तर जशोदा मातांनासुद्धा मरणाची भीती वाटली नाही.** मृत्यूसमयी आपल्याला शिवबाबांचीच आठवण असावी म्हणून त्यांनी निर्मलशांता दादींना ज्ञान मुरली वाचायला सांगितली. ती ऐकता-ऐकता त्यांनी देहत्याग केला. हे आहे खरे ज्ञानी तू आत्म्याचे लक्षण. जशी परमात्मा शिव पित्याची महिमा केली जाते 'निर्भय, निर्वैर' तशी बापसमान मुलांचीही स्थिती असली पाहिजे. अशाप्रकारची स्थिती प्राप्त करण्यासाठी पुढील गोष्टी लक्षात ठेवा -

१) आता आपल्या घरी परमधाममध्ये जायचे आहे -

पशुपक्षी, प्राणी सकाळी घरातून बाहेर पडतात व संध्याकाळी आपल्या घरी परत येतात. ते आपले घर विसरत नाहीत. परंतु मनुष्य आत्मे जेव्हा आपल्या घरुन (परमधाममधून) या सृष्टीवर पार्ट बजावण्यासाठी येतात तेव्हा मात्र त्यांना आपल्या घराची विस्मृती होते. जे सर्व आत्म्यांचे घर आहे. तेच पारलौकिक पिता परमात्म्याचे घर आहे. आता आपल्याला घरी नेण्यासाठी स्वयं परमात्मा शिव पिता आले आहेत. ही स्मृती असेल तर मृत्यूची भीती न वाटता, खुशीची अनुभूती होईल. म्हणूनच एका मुरलीत शिवबाबांनी सांगितले आहे,

'बच्चे, शरीरभी चला जाये, लेकिन खुशी नही जाये।'

२) पुण्य कर्म करण्यासाठी शरीर मिळाले आहे, याचे सदैव भान ठेवा–

जसा एखादा ड्रायव्हर कर्ज काढून नवीन गाडी घेतो. त्या आधारे खूप कमाई करतो आणि खुश होतो. कालांतराने ती गाडी जुनी झाली तरी त्याला दुःख वाटत नाही. फक्त त्या गाडीचा तो जरा जपून उपयोग करतो. तिच्या देखभालीवर त्याला थोडा फार खर्च करावा लागतो. तसंच काहीसे शरीररुपी गाडीचे आहे. त्यामुळे शरीररुपी गाडी जोपर्यंत सुस्थितीत आहे तोपर्यंत जेवढी होईल तेवढी पुण्याची कमाई जमा करा महणजे शरीर सोडतांनाही खुशी व समाधान कायम राहिल.

मम्मा–बाबांनासुद्धा शारीरिक व्याधी होत्या. परंतु त्यांनी योगबळाच्या आधारे अगदी सहजपणे कर्मभोगावर विजय प्राप्त केला होता. त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत ईश्वरीय सेवा करून आपले जीवन १००% सफल केले. **राजयोगिनी दादी जानकीजी आज आपणा सर्वांपुढे जिवंत उदाहरण आहेत. दादीजींनी १०३ व्या वर्षात पदार्पण केले आहे. वयोमानानुसार त्यांनाही शारीरिक व्याधी आहेत. परंतु आजही तरुणांना लाजवेल इतका उमंग–उत्साह त्यांच्यात आहे. मागील वर्षी ईश्वरीय सेवेसाठी देश–विदेशात जाऊन, सुमारे ७० हजार कि.मी. विमानाचा प्रवास करून त्यांनी एक रेकॉर्ड बनवले आहे.** दादीजींच्या हृदयी सदैव हाच भाव असतो की 'बाबा चला रहा है, बाबा करा रहा है, मैं तो बस निमित्त हूँ...' हाच भाव आपण आपल्या जीवनात देखील धारण करुया.

३) शरीर कर्मजन्य आहे. त्यामुळे कर्माचा लेखाजोखा चुकता होताच शरीरही सुटेल –

जेव्हा आपण शारीरिक व्याधीच्या रुपाने कर्मभोग भोगत असतो तेव्हा आपला कर्माचा लेखाजोखा (हिसाब–किताब) चुकता करीत आहोत, ही स्मृती ठेवा. जसे आपण घेतलेले कर्ज हप्त्याने परत करत असतो. त्यातून मुक्त झाल्यानंतर आपल्याला आनंदच होतो. तसेच कर्मभोगावर मात करण्यासाठी, त्यातून मुक्त होण्यासाठी कर्मयोगाचा अभ्यास करा. अर्थात प्रत्येक कर्म योगमुक्त होऊन करा. म्हणजे कर्मभोग लवकरच चुकता होईल. याचेच गायन आहे –

'सिमर सिमर सुख पावो, कलह–क्लेश मिटे सब तनके।
जीवनमुक्ती पावो...'

४) जीवनाची प्रत्येक घडी ही अंतिम घडी समजा –

मरणापूर्वी पापातून मुक्त होण्यासाठी एक व्यक्ती संत–महात्म्याकडे गेला. त्याने महात्म्याला विचारले की मला धर्मराजच्या शिक्षेची फार भीती वाटते. त्यामुळे पापांपासून मुक्त होण्याची काही युक्ती आहे का? महात्म्याने त्याला मोठे युक्तियुक्त उत्तर दिले. ते म्हणाले, 'आता खूपच उशीर झाला आहे. तुमच्या आयुष्यातील केवळ ७ दिवसच उरले आहेत. त्यामुळे तुम्ही जाऊ शकता.' त्या व्यक्तीने त्यांचे पाय धरले व त्यांना विनवणी करु लागला. तेव्हा महात्माजी महणाले. आता फक्त तुम्ही सर्वांकडे जाऊन आपल्या पापकर्माची क्षमा मागा व होईल तेवढे चांगले वागा. त्यानुसार त्या व्यक्तीने सर्वांकडे जाऊन माफी मागितली व सर्वांशी जेवढे चांगले वागता येईल, तेवढे चांगले वागला. त्याच्यातील हे परिवर्तन पाहून सर्वांनी त्याचे कौतुक केले. बघता–बघता सात दिवसाचा कालावधी संपला. परंतु त्या व्यक्तीला मरण काही आले नाही. त्यामुळे आठव्या दिवशी ती व्यक्ती महात्म्याकडे गेली. तेव्हा त्यांनी विचारले की मागील सात दिवसात काही पापकर्म झाले का? त्यावर ती व्यक्ती म्हणाली की कुठलेही पापकर्म झाले नाही कारण समोर मृत्यू दिसत होता. तात्पर्य म्हणजे आपल्या जीवनातील प्रत्येक घडी ही अंतिम घडी आहे, असे समजून चाला म्हणजे कोणतेही पापकर्म होणार नाही.

५) जिवंतपणी शरीरापासून अलिप्त रहाण्याचा अभ्यास –

मी अशरीरी आत्मा आहे. या देहापासून भिन्न आहे. मी एक चैतन्य शक्ती आहे व या शरीराचा आधार घेऊन, कर्म करीत आहे. मी या

कर्मेंद्रियांचा राजा आहे; असा अभ्यास करा. तसेच दुसऱ्यांनाही आत्मिक दृष्टीने बघा. त्यांच्याशी आत्मिक वृत्तीने अर्थात बंधुत्त्व भावनेने व्यवहार करा. म्हणजे आपली स्थिती आत्मअभिमानी बनत जाईल. फलस्वरुप आपल्याला कुठल्याही गोष्टीचे भय वाटणार नाही. या सृष्टिनाटकाकडे साक्षी, द्रष्टा बनून पाहिल्याने कुठलीही परिस्थिती आपल्याला विचलीत करु शकत नाही. तसेच आपली स्थिती सदा प्रसन्न राहिल. याचेच यादगार चित्र भक्तिमार्गात 'सागरातील शेषशायी विष्णु'च्या रुपाने दर्शविण्यात आले आहे.

अशारीतीने आता संगमयुगात पूर्णतः निर्भय बना. कुठल्याही परिस्थितीला कधीही घाबरुन जाऊ नका. कारण आपण शिवबाबांची लाडकी मुले आहोत. त्यांच्या छत्रछायेखाली संपूर्ण सुरक्षित आहोत. परमात्मा पिता आपणा सर्वांची चैतन्य ठाकूरच्या रुपाने पालना करीत आहे. मग आपल्या वाटेला भय येणार तरी कसे? त्यामुळे सदा बापसमान निर्भय, निर्वैर स्थितीचा अनुभव करा. हीच संगमयुगाची सर्वश्रेष्ठ प्राप्ती आहे.

***

(पान क्र. २३ वरुन)

म्हटलेले ही जाते, निंदकाचे घर असावे शेजारी, कारण अंगणातला केर कचरा फुकटात झाडून काढणाऱ्या व्यक्ती समान, निदंक ही निंदेच्या झाडूने मी पणाचा, मानी-अभिमानी संस्कारांचा मळ व अंगावर चढलेल्या देह अभिमानाची धूळ झाडून काढतात. त्याच्या कटु वचनरुपी छन्नीने कला गुणांमुळे बुद्धीवर चढलेला घमेंडीचा पूट (थर) ही भंगतो. निंदक टाचणी सारखं टोचून बोलून चांगुलपणाच्या कौतुकामुळे गर्वाने फुगलेला छातीचा फुगा फोडतात. त्रुटी व चुकांचे वर्णन करून, उणे-दुणे काढून, काट्याने काटा काढणारा व्यक्तिमत्वातल्या दोषांचे काटे काढून उपकारच करतात. पावलो पावली वाटेत काटे टाकणारे विघ्नसंतोषी, जीवनाच्या वाटेवर चालायला शिकवतात. आलोचक आलोचनेद्वारे 'आपण किती पाण्यात आहोत' - हे सांगून अप्रत्यक्षपणे आत्मनिरीक्षण करायची प्रेरणा देतात व आलोचना करून पद-प्रसिद्धी-पैशाच्या उपलब्धीने उपजलेली उर्मी उतरविणारे आलोचक, शुभचिंतक ठरतात. डाग टिपणारे आरसा बनून चारित्र्याचा चेहरा नीट नेटका करतात. उणीवा काढणारे लोक अवगुणांकडे लक्ष वेधून गुणवान बनायचा सल्ला देतात.

समाज कंटक, वैरी विरोधींचा विरोध सोसल्याने जीवंतपणी मूर्ती घडते. **सहन करता-करता दानव ही मानव व मानव ही देव बनतो. ओबडधोबड गारगोटी सारख्या कुसंस्कारी पत्थरबुद्धी आत्म्याला तराशून कोहिनूर हिरा बनविणारा व दगडासम मानवातून दिव्यत्त्वाला प्रकट करणारा खरचं एक अद्‌भूत शिल्पकार आहे.... सहनशीलता!**

(क्रमशः)

***

वाचकांशी हितगुज

- सन २०१९-२० हे मराठी द्वैमासिकाचे ३५ वे वर्ष आहे. त्या अनुषंगाने वाचकांकडून अनेक सदिच्छाप्रत संदेश प्राप्त झाले आहेत. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार! यापुढेही आपण असाच उदंड प्रतिसाद देत रहाल, ही मनोमनी खात्री आहे. अमृतकुंभ हे मराठी भाषिक बंधुभगिनींसाठी ईश्वरीय ज्ञान प्रदान करणारे, एकमेव द्वैमासिक आहे. त्यामुळे आपण याचा अधिकाधिक प्रसार अवश्य करावा.
- **विशेष बाब म्हणजे पेपराच्या किंमतीत मोठी वाढ झाल्याने सन २०१९-२० ची वार्षिक वर्गणी रु.७५/- व आजीव सभासद वर्गणी रु.१४००/- इतकी राहिल. याची नोंद घ्यावी.**
- काही सेवाकेंद्रांकडून सन २०१९-२० ची अमृतकुंभची मागणी अद्याप प्राप्त झालेली नाही. तरी संबंधित टीचर्स भगिनींनी फोन वा इमेलद्वारे त्वरीत कळवावी, ही विनंती.

– प्रकाशक अमृतकुंभ

कमजोर संस्कारांना परिवर्तन करण्यासाठी...

ब्र. कु. भगवानभाई, शांतिबन (आबू रोड)

प्रत्येकामध्ये कोणता ना कोणता एक विशेष कमजोर संस्कार असतो जो ब्राह्मण जीवनात विघ्नरुप बनून, पुरुषार्थात अडथळा निर्माण करत असतो. त्या कमजोर संस्कारामुळे वारंवार वाईट विचार चालल्यामुळे, वायुमंडळ दुषित होते तसेच वृत्तीसुद्धा नकारात्मक बनते. त्या संस्कारामुळे साधक आत्मचिंतन व परमात्म चिंतन करू शकत नाही. असा साधक एकाग्र होऊ शकत नाही, कर्मयोगी बनू शकत नाही. त्याच्या मन-बुद्धीची भटकंती सुरुच असते. या कमजोर संस्कारामुळे साधक कर्मेंद्रियांच्या वश राहतो. वर्तमान समयी स्वतःचा कमजोर संस्कार हाच पुरुषार्थातील फार मोठा अडथळा आहे. ज्यावेळी आपल्यातील ही मुख्य कमजोरी दूर होईल तेव्हा आपण खऱ्या अर्थी मायाजीत बनू.

ज्याप्रमाणे रामायणात दाखवले आहे की श्रीराम आपल्या बाणाने रावणाचे एक शीश उडवतात तेव्हा ते पुन्हा आपोआप जोडले जाते. दुसरे शीश उडवले तरी तसेच होते. शेवटी श्रीराम थकून गेले तेव्हा बिभीषणाने येऊन श्रीरामांना सांगितले की रावण तसा मरणार नाही. त्याच्या बेंबीमध्ये बाण मारा म्हणजे तो मरेल. त्याप्रमाणे श्रीरामांनी रावणाच्या बेंबीत बाण मारला तेव्हा रावण मेला. त्याचप्रमाणे आपण सुद्धा कोणी २५ वर्षापासून, कोणी १५ वर्षापासून, कोणी ५ वर्षापासून विकार रुपी रावणाला मारायचा प्रयत्न करीत आहोत. परंतु एक विकार जिंकला असे वाटते, तोच कालांतराने पुन्हा जागृत होतो. परिणामतः विकारांना जिंकण्याचे युद्ध चालूच आहे. त्यामुळे जोपर्यंत आपण आपल्यातील मुख्य कमजोरीला समाप्त करीत नाही तोपर्यंत रावण मरणार नाही. आपल्यातील मुख्य कमजोर संस्कार हीच विकाररुपी रावणाची बेंबी आहे.

आपल्यातील मुख्य कमजोर संस्कार कसा ओळखाल?

विचार करा की वयाच्या ६ वर्षापासून ते ज्ञानात येईपर्यंत आपण कोणत्या कमजोरीच्या वशीभूत वारंवार झालो. त्यानंतर ज्ञानमार्गात आल्यानंतर कोणती कमजोरी आपल्याला पुन्हा-पुन्हा आकर्षित करते. परिणामतः आपल्या हातून त्याच त्याच चुका होतात. त्यावरुन लक्षात येईल की आपल्यातील मुख्य कमजोरी कोणती आहे.

भीष्मपितामह यांच्यापुढे रणांगणावर जेव्हा शिखंडी येतो तेव्हा त्यांच्यातील बळ जणू नाहीसे होते. त्याचप्रमाणे आपल्यामध्ये जेव्हा कमजोरीचे संस्कार जागृत होतात तेव्हा आपल्यातील ज्ञानबल, योगबल काम करू शकत नाही. परिणामतः आपल्या हातून चुका होतात. आपल्यातील कमजोरीचे संस्कार हेच जणू आपल्यासाठी शिखंडीचे रुप आहे. या कमजोर संस्काराच्या आहारी जाऊन आपण जन्मोजन्मी क्षणिक सुख घेतलेले आहे. म्हणूनच ही कमजोरी वर्तमान समयी आपल्या जीवनात प्रभू मीलनामध्ये अडथळा आणत आहे, अशा या कमजोर संस्काराला परिवर्तन करण्यासाठी कुठला पुरुषार्थ करण्याची आवश्यकता आहे, ते आपण पाहूया.

१) रोज अमृतवेळेला आपल्या कमजोरी विषयी शिवबाबांना सांगा –

ज्याप्रमाणे हॉस्पिटलमधील डॉक्टर वॉर्डमध्ये जाऊन रोज प्रत्येक पेशंटची तपासणी करतो. त्यावेळी पेशंट आपल्याला होणारा त्रास मनमोकळेपणाने सांगतो. त्यानुसार डॉक्टर औषध लिहून देतो. त्याचप्रमाणे सारी दुनिया देखील

एक हॉस्पिटल आहे. प्रत्येकामध्ये कुठला ना कुठला विकाररुपी आजार आहे. सुप्रीम सर्जन शिवबाबा या हॉस्पिटलमध्ये रोज अमृतवेळेला चक्कर मारत असतात. त्यावेळी उठून आपल्यातील कमजोरी बद्दल शिवबाबांना सांगायचे आहे. म्हणजे ते ज्ञान मुरलीतून अथवा एखाद्या भाऊ-बहिणीच्या माध्यमातून योग्य तो उपाय सांगतील. फलस्वरुप आपण त्या कमजोरीवर सहज विजय प्राप्त करू शकू.

२) त्या कमजोरीला हवापाणी देऊ नका.

आपल्यातील कमजोर संस्कार वारंवार रिपीट (पुनरावृत्त) होण्याचे मुख्य कारण म्हणजे त्याला काही ना काही हवापाणी मिळत रहाते. परिणामतः ती कमजोरी उफाळून येते व आपल्या हातून विकर्म घडते. समजा एखाद्याची कमजोरी अपवित्रता अथवा कामविकार आहे. अशी व्यक्ती जर इंटरनेटवरून अश्लील फोटो, अश्लील चित्रपट पहात असेल, अश्लील गाणी ऐकत सेल, अश्लील साहित्य वाचत असेल तर त्या व्यक्तीच्या मनात काम विकार वारंवार निर्माण होईल व त्याच्या हातून विकर्म होत राहिल. तात्पर्य म्हणजे जी कमजोरी आपल्याला घालवायची आहे तिच्यापासून स्वतःला दूर ठेवणे आवश्यक आहे. तरच आपण त्या कमजोरीपासून मुक्त होऊ शकू.

३) अशरीरी, आत्मअभिमानी किंवा बीजरुप स्थितीचा अभ्यास करा.

आपल्या कमजोरीला समाप्त करण्यासाठी अशरीरी, आत्मअभिमानी स्थिती किंवा बीजरुप स्थिती एखाद्या ब्रह्मास्त्राप्रमाणे कार्य करते. कारण या स्थितीमुळे आपल्याला खरे आत्मिक सुख प्राप्त होते. त्याच्या पुढे कमजोरीपुढे प्राप्त होणारे क्षणिक सुख फिके वाटू लागते. परिणामी त्या क्षणिक सुखाचे वैराग्य येते. जसे एखाद्या पडक्या घरात दीर्घकाळ लाईट नसेल तर तेथे भूतांचा वास असतो असे म्हटले जाते. तसेच आपल्या शरीररुपी घरात जर आत्मारुपी दीपक प्रज्ज्वलित नसेल तर तेथे कमजोरी रुपी भूतांचा अथवा विकारांचा वास असतो. म्हणूनच आत्मिक स्मृतीचा दीपक सतत तेवत ठेवणे, आवश्यक आहे.

४) श्रीमताचे काटेकोरपणे पालन करा –

श्रीमताचे काटेकोर पालन केल्याने आपली स्थिती अतिशय शक्तिशाली बनते. परंतु जेव्हा आपण श्रीमताचे उल्लंघन करतो किंवा श्रीमतामध्ये मनमत मिक्स करतो तेव्हा आपली स्थिती कमजोर बनते. अशावेळीच आपल्यातील कमजोरीचा वार होतो. त्यामुळे आपली दिनचर्या ही पूर्णतः श्रीमतानुसार असली पाहिजे, याकडे विशेष लक्ष द्या. शिवबाबा मुरलीतून सांगतात की माया माझी लाडकी मुलगी आहे. त्यामुळे माया आपली थोरली बहीण झाली. लौकिकमध्ये सुद्धा जेव्हा एखादा भाऊ आपल्या वडिलांचे म्हणणे ऐकत नाही तेव्हा थोरली बहिण भावाला थप्पड मारतेच ना! त्याचप्रमाणे जेव्हा आपण श्रीमताचे पालन करीत नाही तेव्हा माया आपल्याला थप्पड मारते. म्हणूनच श्रीमताचे काटेकोरपणे पालन करूया.

५) स्वतःला नेहमी लौकिक वा अलौकिक कार्यात व्यस्त ठेवा –

असे म्हटले जाते की 'रिकामे मन सैतानाचे घर असते'. जेव्हा आपण रिकामे असतो तेव्हा मनात कमजोर संस्कार जागृत होण्याची शक्यता अधिक असते. म्हणून मनाला नेहमी बिझी ठेवा. त्यासाठी रात्री झोपण्यापूर्वी किंवा अमृतवेळेनंतर आपली दिनचर्या (लौकिक व अलौकिक) सेट करा व त्यानुसार पुरुषार्थ करण्याचा प्रयत्न करा.

६) ज्वालास्वरुप योग तपस्या करा –

ज्याप्रमाणे भाजलेले बीज उगवत नाही त्याप्रमाणे ज्वालास्वरुप योगाद्वारे आपल्यातील कमजोर संस्कारांचे बीज भस्म करा म्हणजे त्याचा अंश आणि वंश दोन्ही समाप्त होतील. त्यासाठी अमृतवेळेला विशेष योगाभ्यास करा. अमृतवेळेला योग जितका अधिक शक्तिशाली असेल, कमजोरीपासून तितकी सहज मुक्ती प्राप्त होईल.

७) आपल्या कर्मेंद्रियांवर कंट्रोल (नियंत्रण) ठेवा –

कमजोरीचे संस्कार पुन्हा-पुन्हा जागृत होतात. याचा अर्थ कोणत्या ना कोणत्या कर्मेंद्रियावर आपले नियंत्रण कमी आहे. त्यासाठी रोज आपल्या

(पान क्र. ३२ वर)

(पान क्र. १४ वरुन)

असते. **बंधुनो, हा ड्रामा इतका शक्तिशाली आहे की, केवळ धर्मग्लानी समयीच पतितांना पावन करण्याचा पार्ट तो सर्व शक्तिवान परमात्म्याद्वारे कल्प-कल्प करवून घेत असतो. म्हणून तर परमात्म्याचे महावाक्य आहे की, 'बच्चे, मैं भी इस ड्रामामें बंधायमान हूँ।'** ड्राम्याचे जरी आत्मा, परमात्मा व पाच तत्वांवर बंधन असले तरी त्यालाही ५००० वर्षांच्या काळाचे बंधन आहे. ह्यामध्ये एका मिनिटाचा ही फरक पडत नाही.

ड्राम्याच्या पुनरावृत्तीमुळेच परमात्म्याला ही कल्प कल्पांचे ज्ञान प्रदान करणे अपरिहार्य असते. म्हणून ज्ञान मुरलीत तसेच भिन्न भिन्न स्वमानात कल्प कल्प, अनगिनत बार, कई बार, अनेक बार, और एक बार. कल्प पहिलेवाले बच्चे इत्यादी शब्द येत असतात. हे शब्द ड्राम्याच्या पुनरावृत्तीमुळेच निर्माण होणे अपरिहार्य असते. पुनरावृत्त होणाऱ्या ड्राम्यामुळेच परमात्मा ब्रह्मावत्सांना त्यांच्या आदि स्वरुपाची स्मृती वारंवार देऊन स्मृतीर्लब्धा (स्मृतीस्वरुप) बनवित आहे. **त्यासाठी त्याचे महावाक्य आहे, 'बच्चे तुम कल्प-कल्प देवता बने थे और हर बार तुम्हे देवता बनना है।** अशाप्रकारे ह्या वैश्विक ड्राम्यात पुनरावृत्ती (Repeatation) निश्चित असली तसेच परमात्माही देवत्वपदाची दिव्यस्मृती प्रदान करीत असला तरी ब्रह्मावत्सांच्या पुरुषार्थात मात्र निश्चिंतता नसावी. **बंधुनो, ज्याप्रमाणे ड्राम्यात प्रारब्धाची नोंद आहे, तद्वतच ते प्रारब्ध प्राप्त करण्याअर्थ केलेल्या पुरुषार्थाचीही नोंद आहे. म्हणून दृढ संकल्प करावा की, भूतकाळातील अनेक कल्पात मज आत्म्याने महान दैवी पद प्राप्त करण्याअर्थ पुरुषार्थ ही महान केला होता, तोच महान पुरुषार्थ ह्या कल्पातही करून, तेच महान दैवीपद मजला प्राप्त होणार आहे.** तसेच भविष्यकाळातील अनेक कल्पात असाच महान पुरुषार्थ होऊन, महान दैवी पद मज आत्म्याला प्राप्त होणार आहे. अशाप्रकारे ड्राम्याच्या ज्ञानाने आत्म्यात निश्चिंतता निर्माण होऊन, समय व पुरुषार्थाची योग्य ती सांगड घातली जाते. संपूर्ण ड्राम्याचे अवलोकन केल्यास ज्ञानी तू आत्म्याच्या बुद्धीत हा ज्ञानप्रकाश येईल की, हा बनाबनाया ड्रामा अन्य कोणत्याही आत्म्यांच्या तुलनेत ब्रह्मामुखवंशावळी ब्राह्मणांसाठी अधिक कल्याणकारी आहे. ड्राम्यात हे निश्चित आहे की, केवळ ब्रह्मावत्सच संगमयुगावर त्रिकालज्ञानी होऊन आपले जीवन देवतांच्या पेक्षाही श्रेष्ठ अर्थात हिरेतुल्य बनवितात. ह्याच पुरुषोत्तम संगमयुगावर ते आत्म्याला पौर्णिमेच्या परिपूर्ण चंद्रमाप्रमाणे १६ कला पवित्र बनवून संपूर्ण मुक्ती जीवमुक्तीचा जन्मसिद्ध अधिकार प्राप्त करतात. असे पुरुषार्थी ब्रह्मावत्सच पुढील २० जन्मात भिन्न भिन्न देवत्त्व पदांच्याद्वारे अपार स्वर्गीय सुख प्राप्त करतात. हा ड्रामा युक्तियुक्तही आहे. ह्यात अनेक युक्त्या अप्रत्यक्ष रुपात आहेत. सर्वात मोठी युक्ती तर हीच आहे की, कलियुगातील ७५० कोटी आत्म्यांपैकी केवळ ३३ कोटी मनुष्यात्म्यांनीच परमात्म ज्ञानाच्या आधारे नंबरवार देवत्वपद प्राप्त करण्याचा पुरुषार्थ करावा. बंधुनो, ड्राम्याचे हे अजब व कल्पनातीत व्यवस्थापन आहे की, महाविनाशानंतर सर्वच आत्मे मुक्तीच्या अवस्थेत परमधामी जातात व केवळ आदि सनातन देवी देवता धर्माचेच आत्मे निर्विघ्न व अपार सुखशांती असलेल्या सत्ययुग, त्रेतायुगात जन्म प्राप्त करतात. परंतु ज्या आत्म्यात असुरी गुण (कामक्रोधादि विकार) आहेत, जे संगमयुगावर परमात्म अवतरणाकडे दुर्लक्ष करतात, जे श्रीमताच्या विपरित आचरण करतात, अशा विपरित बुद्धीच्या मनुष्यात्म्यांना सत्ययुग त्रेतायुगात जन्म प्राप्त करण्याचा अधिकार रहात नाही. अर्थात २५०० वर्षांसाठी त्यांना ह्या साकार सृष्टीवर 'नो ऐंट्री' असते. ह्या दोन अद्वैत युगात द्वैत निर्माण करण्याअर्थ ना अन्य धर्मस्थापक आत्मे येतात ना भक्तिमार्गाचे मार्गदर्शन करणारे संतमहात्मे येतात ना धन दौलत लुटणारे तमोधान आत्मे जन्म घेतात. बंधुनो, परमधामातील प्रत्येक आत्म्यात गती व सद्गती निश्चित असते. जे आत्मे परमात्म्याद्वारे संगमयुगावर सद्गती प्राप्त करून परमधामी जातात. ते आत्मे सद्गतीच्या युगात अर्थात सत्ययुग व

त्रेतायुगात जन्म प्राप्त करतात तर ज्या आत्म्यांना केवळ गती प्राप्त होते ते आत्मे द्वापार कलियुगातच आपला जन्म प्राप्त करतात. सद्गतीच्या दोन्ही सात्विक युगात एकता असल्याने तेथे केवळ एक धर्म, एक देवता वर्ण, एक राज्य, एक भाषा व विचारात एकता असल्याने देवी देवतांच्या सुखात, त्यांच्या देवत्व पदात, दैवी संस्कृतीत, दैवी धर्मात राजाईच्या हक्कात व त्यांच्या पवित्र प्रवृत्तीत २५०० वर्षे कोणतीही बाधा निर्माण होत नाही. तेथे संपूर्ण विश्वात एका भारताशिवाय अन्य कोणताही देश अस्तित्वात नसल्याने कोणी कोणावर आक्रमण करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अर्थात त्यांची राष्ट्रीय एकात्मता अबाधित असते. बंधुनो, हेच ते सात्विक स्वर्गीय सुख होय. जेथे अहिंसा परमोधर्माचे सहज पालन केले जाते. जेथे केवळ पवित्र प्रवृत्तीचे सुख आहे. अर्थात माया रावणाचे अस्तित्वच नाही, तेच वास्तविक रामराज्य होय. अशा रामराज्याचे सात्विक सुख केवळ संगम युगावर देवी देवता बनण्याचा पुरुषार्थ करणाऱ्या आत्म्यांनाच प्राप्त होते. हा ड्रामा न्यायपूर्ण असल्यामुळे जे मनुष्यात्मे संगमयुगावर त्या सर्वश्रेष्ठ न्यायाधीशाची आज्ञा मानित नाहीत अथवा सत्ययुग त्रेतायुगासाठी देवी देवता बनण्याचा पुरुषार्थ करीत नाहीत; त्यांना दोन युगे परमधामात बंदिस्त रहावे लागते. अर्थात त्या आत्म्यांना विनाशानंतर केवळ मुक्ती प्राप्त होते जी पुरुषार्थाशिवायही प्राप्त होऊ शकते. मुक्तीच्या स्थितीमुळे आत्मा प्रदीर्घ काळ परमधामात बंदिस्त झाल्याने तो मानवी जीवनापासून वंचित रहातो. आत्म्याच्या ह्या बंदिस्त स्थितीलाच 'मुक्ती' म्हटले आहे. मुक्ती अर्थात आत्मा देहातून, देहाच्या दुनियेतून, कर्मबंधनातून व सुखदुःखांच्या संकल्पातूनही मुक्त असतो. विशेष म्हणजे हा विदेही आत्मा मानवी जीवनातून मुक्त असल्याने ह्या मुक्तीचा तो अनुभव ठरू शकत नाही. परमात्म ज्ञान प्राप्त केल्यास तो आपल्या जीवनात मुक्तीचा अनुभव निश्चितपणे प्राप्त करू शकतो. म्हणून जीवनमुक्ती हीच आत्म्याची अनुभवसिद्ध वास्तविक मुक्त स्थिती होय! अशी जीवनमुक्ती पुरुषार्थाने संगमयुगावर प्राप्त केल्यास प्रारब्ध रुपात जी सत्ययुग त्रेतायुगातही प्राप्त होऊ शकते. अशाप्रकारे दैवी कुलोत्पन्न देवतांना जीवनमुक्तीचे प्रारब्ध प्राप्त झाल्याने दोन्ही युगात अपार सुखशांती प्राप्त करतात. अशी सुखशांती प्राप्त करणाऱ्या व वैश्विक ड्राम्यात हिरो पार्ट बजविणाऱ्या प्रत्येक ब्रह्मावत्साच्या हृदयातून हाच आवाज येत रहावा की, 'वाह! ड्रामा वाह! वाह! मैं आत्मा वाह! वाह! बाबा वाह!'

बंधुनो, ज्यांच्या बुद्धीत ड्राम्याविषयी निश्चय नाही, जो आत्मा ड्रामा बदलण्याची अपेक्षा ठेवतो व ज्याला ड्रामा मनापासून तितकासा पसंत नाही; ज्याच्या मनात भूतकाळातील भिन्न भिन्न घटनांविषयी 'असे व्हायला नको होते, असे व्हायला पाहिजे होते, मी असे केले असते अथवा त्याने तसे केले असते तर बरे झाले असते.' इत्यादी संकल्प निर्माण होतात. हे संकल्पच साधकाला 'वाह वाहचे' गीत म्हणू देत नाहीत. म्हणून मित्रांनो, ड्रामा जसा आहे तसाच त्याला स्विकारून चिंतन करावे की, ह्या कल्याणकारी संगमयुगावरच मज आत्म्याचे ८४ जन्मांचे कल्याण होणार आहे. आत्म्याचा उद्धार अथवा त्याचे सर्वोच्च कल्याण त्याचवेळी होवू शकते ज्यावेळी स्वयं परमात्मा आत्म्याला दिग्दर्शन करून मायेवर विजय प्राप्त करवून देतो. बंधुनो, परमात्मा ह्या ड्राम्याचा दिग्दर्शक अवश्य आहे. परंतु तो ह्या ड्राम्याचा निर्माता मात्र नाही. **म्हणून ड्राम्याविषयी परमात्म्याचे महावाक्य आहे 'बच्चे, यह अनादि ड्रामा है, इसे मैने नही बनाया! इस ड्रामामें पतित आत्माओंको पावन बनाने का मेरा भी पार्ट है।'** स्वयं परमात्म्याची ही महावाक्ये श्रवण करूनही काही ब्रह्मावत्सांचे म्हणणे असते की, 'हा ड्रामा परमात्म्यानेच कधीतरी बनविला असणार? त्यांचे हे म्हणणे मान्य केले तर चोर, दरोडेखरे, अतिरेकी व नारींच्यावर अमानुष अत्याचार करणाऱ्यांचा ड्रामाही त्यानेच बनविला असे म्हणावे लागेल. एक साधा विचार करा परमात्मा तर सतोप्रधानतेचा निर्माता आहे, तो तमोप्रधान मनुष्यात्म्यांचा ड्रामा बनवू शकेल काय? म्हणून ह्या ड्राम्याला 'बनाबनाया' म्हणणेच यथार्थ आहे.

बंधुनो, ज्या नावाच्यामागे 'अनादि' हा शब्द येतो, त्याचा कोणीही निर्माता नसतो. **आत्मा, परमात्मा, परमधाम, सूर्य, चंद्र, तारे, पृथ्वी व पृथ्वीवरील पाच तत्त्वे अनादि आहेत. सूर्याची कोणी निर्मिती करू शकेल काय? अर्थात तो अनादि असल्याने त्याच्या निर्मितीचा प्रश्नच निर्माण होत नाही. तद्वतच हा वैश्विक ड्रामा ही अनादि आहे.** तो कोणी, कधी व कसा बनविला हे प्रश्न विवेकशील मनुष्याच्या मनात निर्माण होऊ नयेत.

असे म्हटले जाते की, 'साधकाने आपल्या पुरुषार्थाची गाडी ड्राम्याच्या व श्रीमताच्या पटरीवरूनच (रुळावरुन) संपूर्णतेच्या स्टेशनपर्यंत घेवून जावी' परंतु साधक ज्यावेळी मनमताचा प्रयोग करतो त्यावेळी माया रावण ह्या रुळाच्या फिशप्लेट ढिल्या करतो. अर्थात ही गाडी पटरीवरून घसरु लागते. हा मनमताचा प्रयोग त्याच्या वाणीद्वारे प्रगट होतो की, 'बाबाने मेरे लिए कैसा ड्रामा बनाया है?' त्या ऐवजी त्याने श्रीमतानुसार संकल्प करून असे म्हणावे की, 'इस बने बनाए ड्रामामें मुझ आत्माका कल्याणही कल्याण है।' साधक हे वाक्य मनापासून उच्चारील तर त्याची घसरलेली रेलगाडी पुन्हा ड्राम्याच्या पटरीवर येईल. ही रेलगाडी ड्राम्याच्या पटरीवरून घसरू नये म्हणून साधकाने तीन निश्चय बुद्धीत ठेवावेत. पहिला निश्चय स्वतःवर अर्थात आत्म्यावर, दुसरा निश्चय परमात्म्याच्या श्रीमतावर तर तिसरा निश्चय ड्राम्यावर असावा. बंधुनो, कोणत्याही परिस्थितीत अचल-अडोल स्थितप्रज्ञ व योगयुक्त स्थिती असणे, हाच साधकाचा अंतिम विजय होय! ज्याप्रमाणे स्थूल युद्धात प्रतिस्पर्धी योद्ध्याशी लढता लढता त्याचा पराभव केल्यावरच विजय प्राप्त होतो. तद्वतच जीवनातील भिन्न भिन्न प्रतिकूल परिस्थिती यशस्वीपणे पार केल्यास साधकाला विजय प्राप्त होतो. निश्चित विजयासाठी आत्मा शक्तिशाली असणे आवश्यक आहे. त्यासाठी साधकाने अष्टशक्ती प्राप्त करून, स्वदर्शन चक्रधारी बनावे. ड्राम्याच्या पुनरावृत्तीचा नियम दुर्धर व्याधीग्रस्तांसाठी अधिक क्लेषकारक वाटू शकतो. परंतु ज्या मनुष्यात्म्याला ड्राम्याचे यथार्थ व व्यापक ज्ञान आहे; ज्याचे आत्मबल उच्चप्रतिचे आहे; जो ह्या व्याधींना खेळ समजतो तो कधीही दुःखी होत नाही. **मम्मांना कॅन्सर तर बाबांना अस्थम्याची व्याधी होती, परंतु त्यांनी कधीही आपल्या व्याधीविषयी तक्रार केली नाही. बंधुनो, जो आत्मा संपूर्ण आहे तो ड्राम्याविषयी अथवा कोणत्याही आत्म्याविषयी कंप्लेन (तक्रार) करीत नाही. त्याला हे ज्ञात असते की, 'इस ड्रामामें हर एकका अपना अपना पार्ट है, उसे भगवान भी नही बदल सकता।'** अर्थात ह्या वैश्विक ड्राम्यात अंशमात्रही बदल कधीच होत नाही. म्हणून त्याला अनादि अथवा अनंत (अन् + अंत) ड्रामा (Never ending drama) म्हटले आहे हा ड्रामा अनंत कल्प चालूच राहणार आहे व अनंत कल्प मज आत्म्याचे अधिकांश कल्याण होणार आहे. **असा संकल्प निर्माण झाल्यास अंतरंगात 'वाह ड्रामा वाह' च्या गीताचे तरंग उमटत राहून, आत्मा प्रश्नांच्या पार सदा प्रसन्नचित्त व निःशंक होईल हे निश्चित!**

***

(पान क्र. २९ वरुन)

कर्मेंद्रियांचा दरबार लावा अर्थात आजच्या दिवसात कोणत्या कर्मेंद्रियाने आपल्याला धोका दिला हे चेक करा. त्याची पुनरावृत्ती होणार नाही, याची खबरदारी घ्या. आपण स्वराज्य अधिकारी आत्मा आहेत. त्यामुळे प्रत्येक कर्मेंद्रिय आपल्या नियंत्रणाखाली असले पाहिजे. तसेच आपले प्रत्येक कर्म हे श्रीमतानुसारच झाले पाहिजे.

अशाप्रकारे वर्तमान समयी आपण कमजोर संस्कारांना समाप्त करण्याचा पुरुषार्थ करणे, आवश्यक आहे. तरच आपण निर्विघ्न स्थिती प्राप्त करू शकू. अन्यथा भविष्यात त्याच कमजोर संस्काराचा अंश हा वंश बनून, विघ्नरुप बनेल. एवढंच नव्हे तर धर्मराज पुरीत सुद्धा आपल्याला खाली मान घालावी लागेल. तसेच आपले भविष्यातील पद देखील भ्रष्ट होईल. त्यामुळे आता कमजोर संस्कारांना परिवर्तन करण्याचा तीव्र पुरुषार्थ करुया.

***

सी. बी. डी. बेलापूर : महाशिवरात्री महोत्सवात उपस्थित भ्राता सिद्धू कमांडेंट, भ्राता रौटेला डी. आ. जी, श्री. रोहिदास पाटील नगरसेवक, ब्र. कु. शीला दीदी व अन्य.

पोईप(मालवण): येथील उपसेवाकेंद्राचे नूतनीकरण कार्यक्रमास उपस्थित राजयोगिनी सुनंदा दीदी व ब्र. कु. शोभा बहेन, ब्र. कु. निलीमा बहेन, प्राचार्य श्री. कांबळी, ब्र. कु. मोहनभाई व अन्य.

अहमदनगर (तपोवन) : येथे शिवरात्री निमित्त शिवलिंग व तपस्या कुंड स्थापन करण्यात आले. त्याप्रसंगी ब्र. कु. राजराजेश्वरी दीदी, निर्मला दीदी, नगरसेविका सुप्रिया जाधव व अन्य.

पेठ वडगाव : महाशिवरात्रीच्या कार्यक्रमाचे प्रसंगी उपस्थित आमदार श्री. मिंचेकर, ब्र. कु. योगिनी बहेन, गीतांजली बहेन व अन्य.

देऊळगावराजा : शिवजयंती उत्सवात दीप प्रज्वलन करतांना आमदार श्री. खेडेकर, ब्र. कु. सुनंदा बहेन, नगरसेविका सुनिता सवडे, मा. नगराध्यक्ष श्री. मोरे व अन्य.

जयसिंगपूर : १,५१,००० तांदुळाचे शिवलिंग बनवून केलेल्या ग्लोबल रेकॉर्डचे प्रमाणपत्र स्विकारतांना ब्र. कु. राणी बहेन.

चंद्रपूर : 'मानसिक स्वास्थ्य' या विषयावर शासकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. कुंदा दीदी व मीनल दीदी.

परभणी : ब्र. कु. शीला दीदी यांना 'राज्यस्तरीय राष्ट्रमाता जिजाऊ समाजभूषण'हा पुरस्कार प्रदान करतांना भ्राता अजमत खान, मीनाताई बोर्डीकर, ब्र. कु. शारदा व अर्चना बहेन.

Registration No. : MAHMAR/2007/21914

सायन (मुंबई) महाराष्ट्र विधानसभा सभागृहात ब्र. कु. शिवानी बहेन यांचे भाषण आयोजित करण्यात आले. त्याप्रसंगी ग्रुप फोटोत मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, शिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे, वनमंत्री श्री. मोनगंटीवार, राजयोगिनी संतोष दीदी व अन्य.

ठाणे : 'कर्करोग तपासणी मोहिम व शिबीर' या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतांना सा. बांधकाम मंत्री श्री. एकनाथ शिंदे, महापौर श्रीमती मीनाक्षी शिंदे, राजयोगिनी गोदावरी दीदी, ब्र. कु. डॉ. शुभदा नील व अन्य.

जळगावः महाशिवरात्री निमित्त निर्मित ३० फूट उंचीच्या शिवलिंगासमोर उभ्या आहेत राजयोगिनी मिनाक्षी दीदी व ब्राह्मण परिवार.

अमरावती : 'आपले भाग्य कोण लिहितो?' या विषयावर भाषण करतांना ब्र. कु. शिवानी बहेन, सोबत ब्र. कु. सीता दीदी, खासदार श्री. आनंदराव अडसुल, ब्र. कु. इंद्रा दीदी, पत्रकार श्री. मराठे, श्री. आहुजा व अन्य मान्यवर तसेच उपस्थित २० हजार श्रोते.